दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ८ वे I पाने ८ I मुल्य रू. ५.०० I अंक २० I गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर ● जळगाव ● धुळे ● नंदुरबार ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● धाराशिव ● लातूर ● नांदेड ● परभणी ● हिंगोली ● अमरावती ● अकोला ● यवतमाळ ● बुलढाणा ● वाशिम ● नागपूर ● वर्धा ● भंडारा ● गोंदिया ● चंद्रपूर ● गडचिरोली ● मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड ● रत्नागिरी ● सिंधुदुर्ग ● पुणे ● सातारा ● सांगली ● कोल्हापूर ● सोलापूर ● नाशिक

# शिक्षक मतदारसंघांत भाजप, शिवसेनेची बाजी

- पुणे शिक्षक मतदारसंघात गावडेंचा विजय
- पुणे पदवीधरमध्ये हर्षदा देशमुख-जाधव विजयी
- छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रतापसिंग पाटील यांची सरशी
- अमरावतीत सरनाईक सलग दुसऱ्यांदा विजयी
- विधान परिषदेच्या पाच जागांत महायुती-महाविकास आघाडीची चुरस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांच्या निवडणुकीचे निकाल बुधवारी (२८ ऑक्टोबर) जाहीर झाले. सुमारे ३० तासांहून अधिक काळ चाललेल्या मतमोजणीनंतर पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे, तर अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक यांनी विजय मिळवला. दुसरीकडे, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाने बाजी मारली. नागपूर पदवीधर मतदारसंघातील निकालाचे चित्र रात्री उशिरापर्यंत निर्णायक टप्प्यावर होते.

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे यांनी शिवसेनेचा पाठिंबा असलेले अपक्ष उमेदवार सचिन सानप यांचा ६ हजार ७७० मतांनी पराभव केला. गावडे यांना २३ हजारांहून अधिक मते मिळाली. विद्यमान आमदार आणि काँग्रेसचे उमेदवार जयंत आसगावकर यांना अपेक्षित यश मिळाले नाही. वयाच्या तिसाव्या वर्षी विधान परिषदेवर निवडून आलेल्या गावडे यांनी हा विजय शिक्षकांचा असल्याची प्रतिक्रिया दिली. शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी काम करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

**पाच जागांच्या निकालांत पुणे शिक्षक आणि अमरावती शिक्षक या दोन जागा महायुतीने जिंकल्या. पुणे व छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघांत शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवला. नागपूरच्या निकालामुळे अंतिम पक्षीय चित्र निश्चित होणार होते. या निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मतमोजणी झाल्याने अनेक ठिकाणी अंतिम निकालासाठी प्रदीर्घ प्रतीक्षा करावी लागली.**

पुणे पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव यांनी भाजपच्या स्मिता जाधव यांच्यावर मात केली. चुरशीच्या लढतीनंतर बुधवारी रात्री त्यांच्या विजयाची घोषणा झाली.

छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघातही शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतापसिंग पाटील यांनी विजय मिळवल्याचे वृत्त आहे. त्यामुळे पदवीधर मतदारसंघांत या पक्षाला दोन महत्त्वाच्या जागा मिळाल्या. अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक यांनी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला. त्यांना १६ हजार ६६३ मते मिळाली. काँग्रेसच्या अदिती पोहरे दुसऱ्या, तर शिवसेनेचे बंडखोर श्रीकांत देशपांडे तिसऱ्या क्रमांकावर राहिले. दुसऱ्या पसंतीच्या मतमोजणीत सरनाईक यांनी विजयाचा आवश्यक कोटा पूर्ण केला.

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे आणि काँग्रेसचे अभिजित वंजारी यांच्यात अटीतटीची लढत झाली. दुसऱ्या पसंतीच्या मतमोजणीत वंजारी यांनी कोहळे यांची आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, रात्री नऊ वाजेपर्यंत अंतिम निकाल जाहीर झाल्याचे वृत्त उपलब्ध नव्हते. त्यामुळे या जागेचा अंतिम कौल स्पष्ट होणे बाकी होते.

## दुष्काळामुळे ३०४ सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सहकार विभागाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील शासन आदेश जारी केला. राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांमधील सहकारी संस्थांच्या निवडणुका सध्या ज्या टप्प्यावर आहेत, त्याच टप्प्यावर स्थगित ठेवण्यात येणार आहेत.

**■ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३कक मधील तरतुदींनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि सभासदांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यास अडचणी येऊ नयेत, हाही याम ागील उद्देश आहे. शासनाच्या पुढील आदेशापर्यंत संबंधित सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात येणार असून, याबाबतचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.**

दुष्काळामुळे शेतकरी आणि शेतमजुरांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी आणि मदतीसाठी महसूल, कृषी, पशुसंवर्धन, सहकार, ग्रामविकास व पाणीपुरवठा यांसह विविध विभागांवर अतिरिक्त प्रशासकीय जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अशा परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया सुरू ठेवल्यास शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामावर ताण येण्याची, तसेच दुष्काळ निवारणाच्या कामावर परिणाम होण्याची शक्यता शासनाने व्यक्त केली आहे.

## एफआरपीत कोळपेवाडीचा कारखाना अव्वल; वरवंडीचा स्वामी समर्थ सर्वांत मागे!

### अहिल्यानगर जिल्ह्यातील २१ साखर कारखान्यांची निव्वळ एफआरपी जाहीर; ऊस उत्पादकांत चर्चेला उधाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** साखर उत्पादनात राज्यात महत्त्वाचे स्थान असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील २१ सहकारी व खासगी साखर कारखान्यांची हंगाम २०२६-२७ साठीची निव्वळ रास्त व किफायतशीर किंमत (एफआरपी) जाहीर झाली आहे. साखर सहसंचालक कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथील कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना ३ हजार ४२ रुपये ३२ पैसे निव्वळ एफआरपीसह जिल्ह्यात अव्वल ठरला आहे. तर नेवासा तालुक्यातील वरवंडी येथील स्वामी समर्थ शुगर अँड एनर्जी कारखान्याची निव्वळ एफआरपी २ हजार ४०२ रुपये २७ पैसे असून, ती जिल्ह्यात सर्वांत कमी आहे. या तफावतीमुळे ऊस उत्पादकांमध्ये चर्चेला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांचे मोठे जाळे आहे. त्यामुळे एफआरपीच्या आकडेवारीकडे शेतकऱ्यांचे विशेष लक्ष असते. कोळपेवाडी कारखान्याची निव्वळ एफआरपी सर्वाधिक असताना वरवंडीच्या कारखान्याची रक्कम तुलनेने कमी असल्याने कारखानानिहाय दरातील फरकाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.या यादीत अकोले तालुक्यातील अगस्ती सहकारी साखर कारखान्याची निव्वळ एफआरपी २ हजार ८७९ रुपये, श्रीरामपूर तालुक्यातील अशोक सहकारी साखर कारखान्याची २ हजार ७९० रुपये ३३ पैसे, तर प्रवरा कारखान्याची २ हजार ७३४ रुपये ३२ पैसे आहे. राहुरीतील प्रसाद शुगर अँड अलाइड ॲग्रो प्रॉडक्ट्सची निव्वळ एफआरपी २ हजार ७४८ रुपये ५५ पैसे आहे.

**एफआरपीतील फरक कशामुळे?**
साखरेचा उतारा, गाळप क्षमता आणि तोडणी-व वाहतूक खर्च यांसारख्या घटकांचा कारखान्यांच्या आर्थिक गणितावर परिणाम होतो. मात्र, निव्वळ एफआरपीतील फरकाची कारणे स्पष्ट होण्यासाठी कारखानानिहाय खर्च आणि प्रत्यक्ष ऊसदराची माहिती महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे जाहीर झालेली आकडेवारी ऊस उत्पादकांसाठी चर्चेचा विषय बनली आहे.

## 'गुजरातचे दोघे सह्याद्री पोखरणार'

### कर्जतच्या प्रकल्पावरून राज ठाकरेंचा हल्लाबोल

- 'मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांना केंद्रातील दोघांकडून शून्य किंमत'
- जंगलतोडीवरून सरकारला धारेवर धरले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत परिसरातील प्रस्तावित उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी सुरू असलेल्या जंगलतोडीवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. महाराष्ट्रातील नैसर्गिक साधनसंपत्ती कोणाच्या हितासाठी वापरली जात आहे, असा सवाल उपस्थित करत त्यांनी केंद्रातील नेतृत्व आणि उद्योगपतींनाही लक्ष्य केले.

कर्जतमधील जाहीर सभेत बोलताना ठाकरे म्हणाले, जंगलातील जुनी झाडे तोडून लाकडांचे ढीग रचलेले पाहून जंगलाच्या अंत्यसंस्काराला आल्यासारखे वाटले. हा प्रकल्प



नेमका कोणाच्या फायद्यासाठी उभारला जात आहे, हे जनतेला समजले पाहिजे. प्रकल्पाबाबत ग्रामसभा, ग्रामपंचायत किंवा विधानसभेत चर्चा झाली का? या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महाराष्ट्रालाच मिळणार का? तिचे वितरण कोणामार्फत होणार? पाणी उचलण्यासाठी लागणारी वीज कुठून आणणार? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. खासगी उद्योगपतींच्या फायद्यासाठी महाराष्ट्राच्या नैसर्गिक संपत्तीचा बळी दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

(पान ४ वर)

## साखर कामगारांचा संप तूर्त स्थगित

**मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणार संयुक्त बैठक; मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाने २२ ऑक्टोबरपासून पुकारलेला साखर कामगारांचा बेमुदत संप तूर्त स्थगित केला आहे. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत साखर कामगारांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सहकार व कामगार विभागाची संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर संघटनांच्या प्रतिनिधींनी संप स्थगित करण्यास सहमती दर्शविली.

राज्य साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस आनंदराव वायकर यांनी ही माहिती दिली. बैठकीला राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, आमदार विनयराव कोरे, साखर कारखाना संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांच्यासह कामगार विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ रद्द करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयावर प्रामुख्याने चर्चा झाली. २२ जुलैच्या राजपत्रानुसार हा कायदा रद्द करण्यात आल्याने साखर कारखानदार आणि कामगारांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता संघटनांनी व्यक्त केली. हा निर्णय स्थगित करून कायदा पुन्हा लागू करण्याची मागणीही करण्यात आली.

केंद्र सरकारने २९ कामगार कायदे रद्द करून चार कामगार संहिता लागू केल्या आहेत. या संहितांमधील तरतुदी आणि राज्यातील संबंधित कायद्यातील तरतुदींची पुनरावृत्ती होत असल्याने हा कायदा रद्द केल्याचे कामगार मंत्र्यांनी स्पष्ट केले. मात्र, कामगारांच्या मागण्यांवर सहकार आणि कामगार विभागाच्या संयुक्त बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

संघटनांनी निवेदनातील अन्य मागण्यांचाही या बैठकीत समावेश करण्याची मागणी केली. त्यावर सकारात्मक चर्चा करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर संप स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## श्रीरामपुर शहरात कृत्रिम पाणी टंचाई

### आडात नाही तर पोहऱ्यात येणार कुठून... साठवण तलावाचे काम रखडल्यास चिंता

**श्रीरामपूर :** दररोज वेळेवर पाणीपुरवठा करणारी नगरपालिका अशी एकेकाळी राज्यभर ख्याती असलेल्या श्रीरामपूर शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली आहे. साठवण तलावाचे बांधकाम हे कासव गतीने होत असल्याने श्रीरामपूर शहरातील पाण्याची चिंता दिवसेंदिवस वाढणार आहे. सध्या थेट आठ दिवसानंतर पाणीपुरवठा करण्याचा निर्णय पालिकेने घेतल्याने शहरातील प्रत्येक घराघरात पालिकेच्या विरोधात असंतोषाची मशाल धगधगत आहे.

स्वप्न न पडताच ते सत्यात उतरावे असेच काहीसे म्हणण्याची वेळ श्रीराम पूरकरांवर आली आहे. अंदाजे १७५ कोटी रुपयांच्या नवीन साठवण तलावाचे काम सध्या चालू आहे. या साठवण तलावाचे काम अत्यंत धीम्या गतीने सुरू असल्यामुळे आश्वासन देत होते. श्रीराम पूर नगरपालिकेला भविष्यात नागरिकांना पाणीपुरवठा करण्यास मोठ्या अडचणी निर्माण होणार आहेत.

**■ श्रीरामपूर शहराचा भविष्यातील २०५१ पर्यंतचा पाणीप्रश्न मिटवण्यासाठी सध्या येथील साठवण तलावाचे मोठ्या प्रमाणावर विस्तारीकरण आणि खोलीकरण सुरू आहे. या नवीन साठवण तलावामुळे शहराची पाणी साठवण क्षमता थेट ९५७ दशलक्ष लीटर होणार आहे, ज्यामुळे शहराला सुमारे ८५ ते ९० दिवस पुरेल इतके पाणी साठवता येईल.**

खासबाब म्हणून शासनाने या साठवण तलावासाठी तातडीने निधी उपलब्ध करून दिल्यासच या तलावाचे काम काही अंशी का असेना पण मुदतीत पूर्ण होण्याचे संकेत आहेत. साठवण तलावाचे काम मुदतीत पूर्ण न झाल्यास भंडारदरा धरणातून पिण्यासाठी सुटणारे पाणी साठवायचे कुठे असा यक्ष प्रश्न पालिकेसमोर उभा ठाकला आहे. पाणी साठवण्यासाठी तलावच नसेल तर पाणी साठवणार कसे आणि कुठे या प्रश्नाने पालिकेची झोप उडवली आहे.





२४ तास पाणी देण्याचे स्वप्न पालिकेने पाहिले होते. मात्र काळाच्या ओघात हे स्वप्न ते स्वप्नच राहिले. दररोज वेळेवर पाणीपुरवठा करणारी नगरपालिका म्हणून ही या श्रीरामपूर नगरपालिकेची ओळख होती. यावरूनच पालिकेच्या खूप निवडणुका झाल्या आणि त्याचा फायदाही सत्ताधाऱ्यांना झाला. श्रीरामपूर नगरपालिका पाणीपुरवठ्याच्या बाबतीत आयडॉल होती. राज्यभरातील राजकीय नेते या श्रीरामपूर पालिकेच्या दररोज होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा दाखला देत. असा पॅटर्न आपणही राबवू असे निवडणुकीत ते आश्वासन देत होते. श्रीरामपुरात येणारा पाहुणा हा कुठूनही आला तर तुम्हाला पाणी दररोज येते असा प्रश्न नेहमी त्यांचा असायचा. आज मात्र हे शब्द थीजले आहेत. (पान ४ वर)

## विखे-थोरातांची सहमती... लंकेंसमोर राहुल शिंदेंचे आव्हान!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यातील परस्परविरोधी राजकीय गट एकत्र आले असताना खासदार निलेश लंके मात्र राजकीयदृष्ट्या एकाकी पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत निलेश लंके यांनी पराभूत केलेले डॉ. सुजय विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यातील वाढती जवळीक चर्चेचा विषय ठरली आहे. या राजकीय समीकरणांचा सर्वाधिक परिणाम पारनेरमधील लढतीवर होण्याची शक्यता आहे.

जिल्हा बँकेच्या २१ जागांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्या आहेत. या निवडणुकीत विविध राजकीय गटांनी सहमतीचे राजकारण स्वीकारल्याचे दिसत आहे. मात्र, पारनेरच्या सोसायटी मतदारसंघात निलेश लंके यांच्याविरोधात डॉ. सुजय विखे पाटील यांचे समर्थक राहुल शिंदे मैदानात उतरल्याने लढत प्रतिष्ठेची बनली आहे. लोकसभा निवडणुकीतील पराभवाची पार्श्वभूमी पाहता, या लढतीकडे विखे-लंके संघर्षाचा पुढील



अंक म्हणून पाहिले जात आहे.

दुसरीकडे, निलेश लंके यांनी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या काळात बाळासाहेब थोरात यांना साथ दिली होती. मात्र, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत थोरात यांची भूमिका आणि लंके यांना मिळणारा पाठिंबा याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

थोरात यांचे जावई रणजितसिंह देशमुख बिनविरोध निवडून आले असताना लंके यांना मात्र निवडणुकीला सामोरे जावे लागत आहे.सहकारी संस्था, साखर कारखाने आणि जिल्हा बँकेतील हितसंबंधांमुळे राजकीय विरोधक एकत्र आल्याचे चित्र आहे. निवडणुकीपुरती युती आणि त्यानंतर पुन्हा राजकीय संघर्ष, अशी भूमिका नेत्यांनी घेतल्याने सामान्य कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत नेत्यांची समीकरणे बदलत असताना निलेश लंके या आव्हानाला कसे सामोरे जातात आणि पारनेरमधील लढतीचा निकाल कोणाच्या राजकीय वर्चस्वावर शिक्कामोर्तब करतो, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# दुष्काळ निवारण : गरज नीलक्रांतीची

महाराष्ट्रातील दुष्काळाने राज्याच्या पाणी नियोजनाचा दुष्काळही समोर आला आहे. तसे बघितल्यास 'नेमिचे येतो पावसाळा' याप्रमाणेच 'नेमिचा सहाव्यात होतो दुष्काळ झळा ,' अशी आपल्या राज्याची स्थिति आहे. प्रत्येक दुष्काळाच्या वेळी पाणी व्यवस्थापन, जलसंधारण, सिंचन यावर चर्चा होते आणि पावसाळा सुरू झाला, की चर्चेवर पाणी फिरते! दुष्काळ कायमचा हटवायचा तर एका हरितक्रांती व धवलक्रांतीप्रमाणे आता नीलक्रांतीची गरज आहे. भान राखून उपाय योजनांचा कृती आराखडा आखून, त्याची जबाबदारपणे अंमलबजावणी केल्यास, अशी नीलक्रांती सहज शक्य आहे.

नीलक्रांती पूर्णत्वास नेण्यासाठी उपाययोजनांचा कालबद्ध कृती आराखडा बनविला पाहिजे. यात प्रामुख्याने नद्यांचे मुख्य खोरे आणि उपखोऱ्यांचा पाणलोट विकास करून पाण्याची उपलब्धता वाढविणे, स्थानिक उपलब्ध पाण्याचे नियोजनासाठी एकात्मिक शिवार जलसंधारण आणि जलसंकल्प व जलवापराचा लेखाजोखा असे नीलक्रांतीच्या कृती आराखड्याचे स्वरूप असावे.

नीलक्रांतीचा कृती आराखडा बनविताना नद्यांचे खोरे व उपखोरे निहाय पाणी उपलब्धता, त्याचे नियोजन व पाणी उपलब्धतावाढीच्या उपाययोजनांचा अंतर्भाव असावा. प्रामुख्याने नद्यांच्या मुख्य खोऱ्यातील अतिरिक्त पाण्याचे अपुऱ्या पाणी उपलब्धतेच्या क्षेत्राकडे वळविणे, महापुराच्या स्थितीत नद्यांतून वाया जाणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन, सह्याद्री व सातपुडा डोंगररांगांच्या माथ्यावरून पलीकडे जाणारे पाण्याचे प्रवाह नद्यांच्या दिशेने वळविणे, पश्चिम वाहिनी नद्यांतून वाया जाणारे पाणी उचलून, अशा उपाययोजनांचा समावेश करता येईल.

सह्याद्रीच्या कुशीतील कोकणात सरासरी दोनशे इंच, सातपुडा पर्वताच्या परिसरात असलेल्या विदर्भात सरासरी शंभर इंच, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश भागात सरासरी कमाल चाळीस इंच पाऊस पडतो. कोकण खोऱ्यात सुमारे एक हजार टी.एम.सी., कृष्णा खोऱ्यात सत्तावन्न टी.एम.सी., गोदावरी खोऱ्यात दोनशे टी.एम.सी., तापी खोऱ्यात शंभर टी.एम.सी. तर नर्मदा खोऱ्यात (महाराष्ट्रातील भाग) सत्तर टी.एम.सी. असे पाचही खोरे मिळून दोन हजार




टी.एम.सी. पाणी उपलब्ध आहे. सदर उपलब्ध पाण्याच्या व्यवस्थापनाचा अभाव आहे. आहे त्या पाण्याच्या उपलब्धतेत वाढ करण्यासाठीच्या उपायांचा दुष्काळ, हे खरे दुखणे आहे.

राज्यात कोकण, कृष्णा, गोदावरी, तापी व नर्मदा अशी पाच मुख्य खोरे आणि पंचवीस उपखोरे आहेत. कोकण, नर्मदा व तापी खोऱ्यातील नद्या पश्चिम वाहिनी असून, कोकण व गुजरात राज्यातून अरबी समुद्रात जाऊन मिळतात. कृष्णा आणि गोदावरी या दोन खोऱ्यातील नद्या पश्चिम वाहिनी आहेत. कृष्णा व गोदावरी खोरे विस्तीर्ण असून सह्याद्री घाटमाथा ते सातपुड्या पर्यंत दक्षिण, उत्तर, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भ असा प्रचंड भूप्रदेश या दोन खोऱ्यांनी व्यापला आहे. त्यामुळे या दोन खोऱ्यांचा जलविकास निर्णायक ठरतो.

राज्यातील खोऱ्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार कोकण, कृष्णा, तापी व नर्मदा हे पाणी उपलब्धतेबाबत विपुल वर्गीकरणात आहेत. तर गोदावरी हे एकमेव खोरे तुटीचे आहे. समन्यायी पाणी वाटप कायद्यानुसार पाण्याचे समान व समन्यायी पाणी वितरण अपेक्षित आहे. सदर तरतुदीनुसार विपुल वर्गीकरणाच्या खोऱ्यातून तुटीच्या गोदावरी खोऱ्यात पाणी आणून तूट भरणे अत्यावश्यक आहे.

कोकण खोऱ्यात पाण्याची मुबलक उपलब्धता आहे आणि तितकाच पाण्याचा अपव्ययही आहे. कोकण व कृष्णा खोऱ्याचे योग्य पद्धतीने पाणी व्यवस्थापन केले,तर गोदावरी खोऱ्याची पाण्याची उपलब्धता वाढविता येऊ शकते. कोकणातील आणि सातपुडा पर्वतरांगांतील वाया जाणारे पाणी कृष्णा, गोदावरी व तापी खोऱ्यात आणल्यास या खोऱ्यांची पाणी उपलब्धता वाढून राज्याच्या बहुतांश भागाचा पाणी प्रश्न सुटू शकतो. नर्मदा खोरे नंदुरबार जिल्ह्यापुरतेच मर्यादित असले, तरी नर्मदा खोऱ्यातील पाणी उचलून ते तापीच्या खोऱ्यात आणल्यास तापी खोऱ्याच्या पाणी क्षमतेत वाढ होऊन खानदेशचा प्रदेश सुजलाम सुफलाम होईल. याच पद्धतीने छत्तीसगड, मध्यप्रदेशामधून विदर्भात येणाऱ्या नद्यांचे जलव्यवस्थापनद्वारे तसेच सातपुड्याच्या पलीकडे वाया जाणारे पाणी उचलून पाणी उपलब्धता वाढविणे शक्य आहे. असे झाल्यास संपूर्ण विदर्भाच्या पाण्याची गरज पूर्ण होईल. अशातऱ्हेने पाच खोरे आणि त्यांच्या उपखोऱ्यातील पाण्याची उपलब्धता वाढविल्यास, दुष्काळाची झळ आणि ईडा -पीडा टळेल.

## शिर्डीतून शिवनेरी गडावर सहलीचे आयोजन, शेकडो युवकांचा सहभाग



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** डॉ. सुजय विखे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या ऐतिहासिक शिवनेरी गडावर भव्य सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. केवळ वाढदिवस साजरा करणे हा या उपक्रमामागचा हेतू नसून राजमाता जिजाऊ यांनी स्वराज्याचे जे संस्कार शिवरायांवर केले, त्याच संस्काराचा वारसा आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि उद्याचा महाराष्ट्र घडविणाऱ्या युवकांना आपल्या गडकिल्ल्यांची, आपल्या शौर्याच्या इतिहासाची खरी ओळख करून देणे, हा या सहलीमागचा उददेश आहे.

जुन्नर तालुक्यातील शिवनेरी हा गड केवळ एक किल्ला नाही तर तो महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा मानबिंदू आहे. याच गडावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. जिजाऊ माँसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली शिवरायांवर याच मातीत स्वराज्याचे संस्कार झाले. त्यामुळे या गडाला भेट देणे म्हणजे केवळ पर्यटन नसून तो इतिहासाचा एक जिवंत धडा आहे. आज मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात युवक इतिहासापासून दूर चालला आहे, अशा परिस्थितीत प्रत्यक्ष गडावर जाऊन तेथील बुरुज, तटबंदी, शिवाई देवीचे मंदिर, बदामी तलाव आणि शिवरायांचे जन्मस्थान पाहिल्यावर युवकांच्या मनात आपोआपच शिवप्रेम आणि राष्ट्रप्रेम जागृत होईल, असा विश्वास आयोजकांना आहे. ही सहल २० ते २२ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली असून प्रत्येक दिवशी एका दिवसाची सहल असणार आहे. सहलीसाठी फक्त पुरुषांनाच प्रवेश देण्यात आला असून वय वर्षे १५ पासून पुढील सर्व युवक आणि ज्येष्ठ नागरिक यामध्ये सहभागी होऊ शकणार आहेत. सहली दरम्यान प्रवासासाठी गाडीची व्यवस्था आयोजकांकडूनच करण्यात येणार असून सकाळच्या चहा, पाणी, नाश्ता आणि दुपारच्या जेवणाची संपूर्ण सोय देखील आयोजकांकडूनच केली जाणार आहे, त्यामुळे सहभागींना कोणतीही काळजी करण्याची गरज नाही. याशिवाय सहलीत सहभागी झालेल्या सर्वांना आयोजकांकडून एक सुंदर टी-शर्ट मोफत देण्यात येणार आहे, जो या ऐतिहासिक क्षणाची आठवण म्हणून कायम जपला जाईल.

## अकारी पडीत जमिनी वाटप प्रक्रियेस चालना देण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** शेती महामंडळाच्या हरिगांव मळा अकारी पडीत जमिनी संदर्भात मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृहात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची, शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्यासमवेत घेण्यात आलेल्या भेटीत अकारी पडीत जमिनी वाटप प्रश्नांस चालना देण्यासाठी मुख्यमंत्री यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली

याप्रसंगी श्रीरामपूर तालुक्यातील हरिगांव मळ्यातील नऊ गावातील अकारी पडित शेतकरी बांधवांच्या हक्काच्या जमिनी त्यांना लवकरात लवकर परत मिळाव्यात हा प्रश्न भेटी दरम्यान पालकमंत्री ना.विखे पाटील यांनी मुख्यमंत्री महोदयांना अवगत करून दिला. यानंतर ना.देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर अन् सकारात्मक चर्चा केली.

संबंधित अधिनियम १९६१ मध्ये आवश्यक सुधारणा करून राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची महामहिम राज्यपाल महोदयांनी स्वाक्षरी करून प्रभावी अंमलबजावणी व्हावी, शेतकरी बांधवांना त्यांच्या हक्काचा न्याय मिळावा आणि त्यांच्या जमिनीचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा, हाच या भेटीमागील मुख्य उद्देश सफल झाल्याची प्रतिक्रिया अँड अजित काळे यांनी दिली.

## कांगोणीचे सरपंच कराळे यांचा वृक्षारोपणाने वाढदिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई-** लोकनियुक्त सरपंच सोमनाथ कराळे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने कुठल्याही प्रकारचा डामडोल न करता अनाठाई खर्च न करता पर्यावरणपूरक व अर्थपूर्ण नैसर्गिक समतोल सुरक्षा साठी हा उद्देश ठेऊन कांगोणी गावातील जागृत देवस्थान श्री खंडोबा मंदिराच्या प्रगणात विविध वृक्षाचे वृक्षारोपण जुन्या पिढीतील वयोवृद्ध १०१ वय असलेल्या ज्येष्ठ व्यक्ति आसाराम नागोजी एडके यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी उपस्थित ज्येष्ठ म्हणून हभप शिवप्रसाद महाराज पंडित, आदिनाथ रौंदळ,अशोकराव चौधरी सर, ज्ञानदेव शिंदे ,कोथंबिरे साहेब,कारभारी बोरुडे , अशोक पाटील चौधरी,उंडे मामा, जगन्नाथ कर्डिले, नामदेव विरकर, गंगाधर विर, शंकर रौंदळ,राजु पाटील शेटे, दादासाहेब कर्डिले,सोपानदादा शिंदे सह गावातील तरुण वर्ग, महिला मंडळ व मित्र परिवार उपस्थित होते. आगळा वेगळा उपक्रम राबवल्याबद्दल उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.



## ज्ञानमाता शाळा ते तीन बत्ती चौक मार्गावरील अतिक्रमणे हटवा, मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर, :** शहरातील कोल्हार-घोटी मार्गावर ज्ञानमाता शाळा ते तीन बत्ती चौक या दरम्यान मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्यालगत पादचाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या पेव्हिंग ब्लॉकवरही दुकानदारांनी अतिक्रमण केल्याने नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. त्यातच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात सिगारेट, गुटखा, तंबाखू



तसेच नशायुक्त पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप युवा सेनेच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर आणि शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करत तातडीने कारवाई करण्याची मागणी युवासेना पदाधिकाऱ्यांनी पोलिस आणि नगरपालिका प्रशासनाकडे निवेदनाद्वरे केली.

कोल्हार-घोटी मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने वाहने व नागरिकांची ये-जा सुरू असते. ज्ञानमाता शाळा ते तीन बत्ती चौक या परिसरात रस्त्यालगत विविध दुकाने आहेत. मात्र, काही दुकानदारांनी दुकानासमोरील पादचारी मार्गावर अतिक्रमण केले आहे त्यामुळे नागरिकांना चालण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होत नसल्याची परिस्थिती आहे. संबंधित मार्गाची प्रशासनाने तातडीने पाहणी करून रस्त्यालगतची सर्व अनधिकृत अतिक्रमणे हटवावीत. अशी मागणी युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख तालुकाप्रमुख सुशील शेवाळे शहर प्रमुख सार्थक शेवाळे यांनी केली.अतिक्रमणांच्या प्रश्नाबरोबरच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नशायुक्त पदार्थांची उपलब्धता होणे चिंताजनक असून, त्याचा शालेय व महाविद्यालयीन युवकांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहर पोलीस प्रशासनाने परिसरातील पानटपऱ्या आणि संशयित विक्री केंद्रांची तपासणी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

## शिर्डीत अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त कार्यालय सुरु करा, मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या श्री क्षेत्र शिर्डी येथे अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालय सुरू करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष)चे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

अहिल्यानगर जिल्हा भौगोलिकदृष्ट्या मोठा असून, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालय सध्या सावेडी येथे आहे. जिल्ह्यातील शिर्डी आणि परिसरातील नागरिकांना अन्न व औषध प्रशासनाशी संबंधित तक्रारी, विविध कामे आणि समस्यांसाठी अहिल्यानगर येथे जावे लागते. ऑनलाइन सुविधा उपलब्ध असल्या, तरी अनेकदा संबंधित अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे नागरिकांना वेळ आणि पैसा खर्च करावा लागतो.

शिर्डी हे महत्त्वाचे धार्मिक पर्यटनस्थळ असून, येथे विविध शासकीय कार्यालये सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त कार्यालय सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल. तसेच अन्नपदार्थांमधील भेसळ करणारे आणि ग्राहकांना सेवा देताना नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

सर्वसामान्य नागरिकांना तक्रारींचे निवारण स्थानिक पातळीवर मिळावे आणि दोषींवर कारवाईला गती मिळावी, यासाठी शिर्डीत हे कार्यालय सुरू करणे काळाची गरज असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे.

## डॉ. वैष्णवी गुडघे यांची वैद्यकीय क्षेत्रात ऐतिहासिक भरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पोहेगांव :**ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षणाची सुरुवात करून आपल्या बुद्धिमत्तेच्या, जिद्दीच्या आणि अथक परिश्रमांच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सोनेवाडी येथील डॉ. वैष्णवी सुरेश गुडघे यांनी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या एमडी मेडिसिन पदव्युत्तर परीक्षेत ७४ टक्के गुण मिळवत त्यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या दैदीप्यमान यशामुळे त्यांची विद्यापीठाच्या सुवर्णपदकासाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, मुंबई येथील सेठ जी. एस. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व केईएम रुग्णालय येथेही त्यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे. डॉ. वैष्णवी यांच्या या यशामुळे सोनेवाडी गावासह कोपरगाव तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर सर्वोच्च यश मिळवता येते, हे त्यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.सोनेवाडीच्या शिरपेचात मानाचा तुरा जिल्हा परिषदेच्या शाळेतून सुरू झालेला शैक्षणिक प्रवास, दहावी-बारावीतील तालुकास्तरीय प्रथम क्रमांक, एमबीबीएसमधील गुणवत्तापूर्ण कामगिरी, पदव्युत्तर प्रवेश परीक्षेतील देशपातळीवरील यश आणि आता एमडी मेडिसिनमध्ये विद्यापीठात प्रथम क्रमांक व सुवर्णपदकाचा बहुमान, असा डॉ. वैष्णवी गुडघे यांचा प्रेरणादायी प्रवास आहे.

## भीमाशंकर व कर्जत पट्यातील वृक्षतोडीच्या निषेधार्थ वृक्ष प्रेमींचा मोर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :**भीमाशंकर व कर्जत पट्यात टोरंट पॉवर जलविद्युत प्रकल्पांतर्गत सुरू असलेली बेसुमार आणि बेकायदेशीर वृक्षतोड त्वरित थांबवून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी नेवासा तालुका वृक्ष व पर्यावरण संघटनेने श्री खोलेश्वर गणपती मंदिरापासून तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदार संजय बिरादार यांना निवेदन दिले. यावेळी महेश मापारी, ॲड. संजय सुखधान, अमृत फिरोदिया, अनिल ताके, ॲड. सादिक शिलेदार, बालेंद्र पोतदार यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या.ते म्हणाले, या बेसुमार वृक्षतोडीमुळे हजारो पशु-पक्षी बेघर झाले



आहेत. महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असताना एका प्रकल्पासाठी लाखो झाडे तोडून पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण केला जात आहे. अभिनेते सयाजी शिंदे यांनी या प्रश्नावर ठोस भूमिका घेतली असून आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली या वृक्षतोडीच्या विरोधात जनआंदोलन छेडणार आहोत. आजवर मोठ्या प्रकल्पांसाठी लाखो झाडे तोडली गेली, मात्र पुन्हा वृक्ष लागवड झाली नाही. सरकार या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा निषेध त्यांनी केला. निवेदनात म्हटले आहे की भीमाशंकर आणि कर्जत पट्यात टोरंट पॉवर प्रकल्पासाठी वन विभागाकडून ६०० एकर जागा देण्यात आली असून आतापर्यंत हजारो वृक्षांची कत्तल झाली आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत आणखी अडीच लाख वृक्ष तोडले जाणार आहेत. यामुळे पक्षी, वन्यजीव, कीटकांचा अधिवास नष्ट होत असून पर्यावरणाची अतोनात हानी होत आहे. स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात न घेता प्रकल्प राबविला जात असून टोरंट कंपनीसाठी सरकार इतके मेहेरबान का, असा सवाल पर्यावरण प्रेमींनी उपस्थित केला आहे. या अंदाधुंद तोडीमुळे स्थानिक जलस्रोत, वृक्षसंपदा नष्ट होऊन आदिवासी बांधव देशोधडीला लागणार आहे.ही वृक्षतोड त्वरित थांबवून जबाबदार घटकांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी अमृत फिरोदिया, अनिल ताके, बालेंद्र पोतदार, ॲड. संजय सुखधान, महेश मापारी, राजेंद्र काळे, ॲड. सादिक शिलेदार, संदीप आलवणे, रामभाऊ केंदळे, दिपक धनगे, दादा देशमुख, ॲड. पांडुरंग औताडे, ॲड. सोमनाथ वाकचौरे, संदीप बेळे, जयवंत मोटे, करीम सय्यद, जालिंदर गवळी, रंजन जाधव, इम्रान दारुवाला आदी उपस्थित होते.

## रग्बीच्या रणांगणात समताचा डंका!

### राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** जिद्द, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर समता इंटरनॅशनल स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलांच्या रग्बी संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील एस.व्ही.जे.सी. टी. स्पोर्ट्स अकॅडमी, डेरवण येथे झालेल्या या स्पर्धेत समताच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली आणि शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला.




स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात समताच्या संघाने मुंबईच्या संघावर १८-० असा एकतर्फी विजय मिळवला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गुण मिळवू न देता मिळवलेल्या या विजयातून समताच्या खेळाडूंचे वर्चस्व स्पष्ट झाले. त्यानंतर नाशिकच्या संघाला १२-५ असे पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या संघाविरुद्ध खेळाडूंनी जोरदार लढत दिली. मात्र, विजेतेपदाने हुलकावणी दिल्याने संघाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले. आक्रमक खेळ, चपळाई, भक्कम बचाव आणि सांघिक समन्वयाच्या बळावर समताच्या खेळाडूंनी राज्यस्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या यशाबद्दल संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडाक्षेत्रातील प्रावीण्यालाही संस्थेत महत्त्व दिले जाते, असे त्यांनी सांगितले. खेळामुळे शिस्त, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होते. समताच्या खेळाडूंनी दाखवलेली जिद्द आणि संघर्षवृत्ती कौतुकास्पद असून, भविष्यात ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही शाळेचा नावलौकिक वाढवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या यशामागे रग्बी प्रशिक्षक सुनील चौधरी यांचे मार्गदर्शन, क्रीडा विभागाचे नियोजन, खेळाडूंचे परिश्रम आणि संस्थेचे सातत्यपूर्ण पाठबळ महत्त्वाचे ठरले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडा विभागाचे अभिनंदन करण्यात आले.

## महिला बचत गटाचे कर्ज माफ करण्यासाठी वंचितचे अनिल जाधव यांचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी**, मोदी व फडणवीस यांचे मित्र असलेल्या उद्योजकांचे हजारो कोटींचे कर्ज माफ केले जाते. मग महिला बचत गटाचे कर्ज का माफ होऊ शकत नाही. जोपर्यंत बचत गटाचे कर्ज माफ होत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. त्यासाठी आम्ही वंचितच्या वतीने मोठे आंदोलन करु असा सज्जड इशारा अनिल जाधव यांनी दिला.

महिला बचत गटाची पूर्ण कर्जमाफी व्हावी, या प्रमुख मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनात दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी राहुरी येथील तहसीलदार डॉ. अमित पवार यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी अनिल जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

महिला प्रदेशाध्यक्षा ज्योती गायकवाड म्हणाल्या कि, राहुरी तालुक्यातील प्रत्येक गावात बचत गट चालवीले जातात. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी शासकीय व खाजगी



बॅंका तसेच मायक्रो फायनान्स कंपनीकडुन कर्ज घेतलेले आहे. चालू वर्षी महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात आला. दुष्काळामुळे सध्या महिलांच्या हाताला रोजगार नाहीत, परिणामी कर्जदार महिला कर्जाचे हप्ते भरु शकत नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी होते, तर मग महिला बचत गटाची कर्जमाफी झालीच पाहिजे.

महिला तालुकाध्यक्षा अनिता जगधने म्हणाल्या कि, दुष्काळामुळे शेतात काम नाही, काम नसल्यामुळे महिलांना हप्ते भरणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत कर्ज वसूली अधिकारी घरात येऊन बसतात. महिलांना अपमानास्पद वागणूक देतात. यापूढे कर्ज वसूलीसाठी अधिकारी आले तर आम्ही सर्व महिला दंडूके घेऊन त्यांच्या मागे लागू असा इशारा अनिता जगधने यांनी दिला.

निवेदन देतेवेळी वंचितच्या महिला जिल्हाध्यक्षा आशाबाई माळी, शहराध्यक्ष ऋषिकेश साळवे, दिपक साळवे, विजय विधाटे, वैभव पंडीत, सुजल जाधव आदिंसह महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## अमृतेश्वर मंदिर परिसरात पायरेन्स आयबीएमएच्या विद्यार्थ्यांची स्वच्छता मोहीम




**लोणी** : शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने पायरेन्स आयबीएमए, लोणी येथील विद्यार्थ्यांनी रतनवाडी येथील ऐतिहासिक अमृतेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. विद्यार्थ्यांनी श्रमदानातून मंदिर परिसर स्वच्छ करून ऐतिहासिक वारशाच्या जतनाचा आणि स्वच्छतेचा संदेश दिला.

सह्याद्रीच्या कुशीत वसलेले अमृतेश्वर मंदिर प्राचीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरातील प्लास्टिक, कागद, खाद्यपदार्थांची वेष्टने आणि इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला. तसेच पर्यटक आणि भाविकांनी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखावी, प्लास्टिकचा वापर टाळावा आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करावे, असे आवाहन केले.

## शिर्डीतील पथविक्रेते संघटनेच्या वतीने डॉ. सुजय विखे यांना दुग्धाभिषेक




**शिर्डी** : शहरातील पथविक्रेते संघटनेच्या वतीने डॉ. सुजय विखे यांचा दुधाभिषेक करण्यात आला. शिर्डी शहरातील पथविक्रेत्यांच्या प्रश्नांसाठी आणि त्यांच्या न्याय हक्कांसाठी विखे पाटील पिता-पुत्रांनी नेहमीच पाठबळ दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित पथविक्रेत्यांनी जयघोष करीत त्यांनी पथ विक्रेत्या चा प्रश्न कायम स्वरूपी सोडवल्या बद्दल आभार व्यक्त केले यावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष प्रसाद बाळू सुरंजे, आदम भाई सय्यद, दीपक रणधीर यांच्यासह सर्व पथविक्रेते संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने पथविक्रेते बांधव उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पथविक्रेत्यांच्या विविध अडचणींवर चर्चा करण्यात आली असून त्यांच्या व्यवसायाला संरक्षण मिळावे आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी विखे यांनी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांनीही पथविक्रेत्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन देत उपस्थितांचे आभार मानले.

## माऊली नगरात हरिनामाचा गजर!



**सोनगाव** : माऊली नगर येथे माऊली प्रतिष्ठानच्या वतीने ३० ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहात ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, कीर्तन, भजन आणि कथासार अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे. संतपरंपरेचा वारसा जपत भक्तिभाव, आध्यात्मिक विचार आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणे हा या सोहळ्याचा उद्देश आहे.

परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हरिनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माऊली प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘दिवाळी पहाट’मुळे महिला उद्योजिकांच्या व्यवसायाला भरारी

## तीन दिवसांत लाखोंची उलाढाल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : दिवाळीच्या खरेदीच्या निमित्ताने महिला बचत गट, गृहउद्योग करणाऱ्या महिला आणि स्थानिक व्यावसायिकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या ‘दिवाळी हाट’ खरेदी महोत्सवाला कोपरगावकरांनी भरघोस प्रतिसाद दिला. तीन दिवसांत लाखोंची उलाढाल झाल्याने महिला उद्योजिकांना आर्थिक उत्पन्नाची संधी मिळाली, तर स्थानिक बाजारपेठेलाही चालना मिळाली.

माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या ‘दिवाळी हाट’ खरेदी महोत्सवात कोपरगाव तालुक्यासह ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी सहभाग नोंदवत आपली उत्पादने विक्रीसाठी आणली होती. घरगुती वस्तू, दिवाळीचे फराळाचे पदार्थ आणि विविध उत्पादनांची विक्री येथे करण्यात आली. दर्जेदार, स्वदेशी आणि रास्त दरातील वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांना खरेदीची चांगली संधी मिळाली.

गौतम सहकारी बँकेच्या माजी संचालिका तथा प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. पुष्पाताई काळे म्हणाल्या की, दिवाळी हाट हा महिला बचत गट आणि महिला उद्योजिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळवून देणारा उपक्रम आहे. अनेक महिला घरगुती उत्पादनांच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत. त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे विक्री वाढण्यासोबतच व्यवसायाचा विस्तार करण्याची संधी मिळत आहे. दिवाळी हाटच्या माध्यमातून नागरिकांनी स्थानिक महिला व्यावसायिकांच्या उत्पादनांची खरेदी केल्यास त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळ मिळते. तसेच, स्थानिक पातळीवर होणाऱ्या आर्थिक उलाढालीतून छोट्या व्यावसायिकांना प्रोत्साहन मिळते आणि तालुक्याच्या अर्थकारणाला चालना मिळते. महिलांच्या कौशल्याला संधी, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा ‘दिवाळी हाट’चा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

‘दिवाळी हाट’मुळे तीन दिवसांत वर्षभराच्या नफ्याइतके उत्पन्न मिळण्याची संधी; आमच्या व्यवसायाला हक्काची बाजारपेठ मिळाली अशा शब्दात महिला विक्रेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आमच्यासारख्या छोट्या व्यावसायिक महिलांसाठी ‘दिवाळी हाट’ म्हणजे केवळ स्टॉल लावण्याची संधी नसून व्यवसायाला नवी दिशा देणारे हक्काचे व्यासपीठ आहे. वर्षभर मेहनत करून जेवढा नफा मिळतो, तेवढा नफा या तीन दिवसांत मिळत असल्याचा अनुभव काही महिलांनी व्यक्त केला.

ग्राहकांपर्यंत थेट पोहोचता येते, उत्पादनांची ओळख निर्माण होते आणि पुढील काळातही खरेदी करणारे ग्राहक जोडले जातात. कोणताही मार्केटिंग खर्च न करता एवढ्या मोठ्या बाजारपेठेत आपली उत्पादने विकण्याची संधी मिळणे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. महिला बचत गट आणि छोट्या व्यावसायिक महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी अशी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. पुष्पाताई काळे आणि सौ.चैतालीताई काळे यांचे आभार मानले.

## बायोमायनिंग प्रकल्पाच्या चौकशीसाठी सात दिवसांची मुदत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नगरपरिषदेच्या भुयारी गटार योजनेतील निधी अन्यत्र वळविल्याच्या प्रकरणात तत्कालीन लेखापाल महेश कवटे यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस नाशिक विभागीय आयुक्तांकडे करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांचा सहभाग आहे किंवा नाही, याची चौकशी करण्यासाठी समिती गठित करून १५ दिवसांत अहवाल सादर केला जाणार आहे. दुसरीकडे, बायोमायनिंग प्रकल्पातील कथित अनियमिततेची सात दिवसांत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिल्याने शिवसेनेचे शिर्डी लोकसभा जिल्हाप्रमुख राजेंद्र देवरकर यांनी अन्नत्याग आंदोलन तूर्त स्थगित केले आहे.

श्रीरामपूर नगरपरिषदेच्या कंपोस्ट डेपोवरील कचरा बायोमायनिंग प्रकल्पातील कथित अनियमितता आणि भुयारी गटार योजनेतील निधीच्या विनियोगाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी देवरकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेत दोन्ही प्रकरणांतील चौकशी व कारवाईबाबत आश्वासन दिले आहे. भुयारी गटार योजनेचा निधी अन्यत्र वळविण्याच्या प्रकरणात तत्कालीन लेखापाल महेश कवटे यांच्याविरोधात कारवाईची शिफारस यापूर्वीच करण्यात आली आहे. मात्र, तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांची या प्रकरणातील भूमिका स्पष्ट करण्यासाठी स्वतंत्र समिती गठित केली जाणार आहे. ही समिती १५ दिवसांत अहवाल सादर करणार असून, त्यानुसार पुढील कारवाईचा निर्णय घेतला जाईल.

दरम्यान, बायोमायनिंग प्रकल्पाच्या विशेष लेखापरीक्षणासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर केला जाणार आहे. अहवालात संबंधित अधिकारी किंवा ठेकेदार दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे.

प्रशासनाच्या या आश्वासनानंतर देवरकर यांनी अन्नत्याग आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, चौकशी निर्धारित मुदतीत पूर्ण करून दोषींवर प्रत्यक्ष कारवाई होणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे श्रीरामपूरकरांचे लक्ष लागले आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिले व्हीएचएफ रिपीटर स्टेशन शिर्डी रेडिओ क्लबला मंजूर!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : भारत सरकारच्या दूरसंचार विभागाने शिर्डी अमॅच्युअर रेडिओ क्लबला व्हीएचएफ रिपीटर स्टेशन उभारण्याची अधिकृत परवानगी दिली आहे.

या स्टेशनसाठी ‘व्हीयू२एएफएन’ हे कॉल साइन मंजूर करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अशा प्रकारचे प्रमाणपत्र मिळवणारी ही पहिली संस्था ठरल्याचा दावा क्लबने केला आहे.

मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावर हे स्टेशन उभारण्यात येणार आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ९५० मीटर उंचीवर हे ठिकाण असल्याने परिसरातील रेडिओ संपर्काला मदत होण्याची अपेक्षा आहे. या यंत्रणेद्वारे वॉकी-टॉकी आणि अन्य सुसंगत रेडिओ उपकरणांच्या माध्यमातून संपर्क साधता येणार आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात मोठ्या गर्दीच्या वेळी मोबाईल नेटवर्कवर ताण आल्यास तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात संपर्क यंत्रणा विस्कळीत झाल्यास हे स्टेशन उपयुक्त ठरू शकते.

कायदा-सुव्यवस्था, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन संदेशवहनासाठीही त्याचा वापर करता येईल. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना वायरलेस संपर्क तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

क्लबचे समन्वयक परशुराम कुटे यांनी या मान्यतेबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले. या उपक्रमासाठी डॉ. किशोर गालनिबकर, डॉ. करणसिंह घुले, डॉ. गणेश दारुंटे, आप्पासाहेब ढुस, शिवाजी घाडगे, वसंत कुऱ्हे आणि सुभाष सोनवणे यांनी विशेष प्रयत्न केल्याचे क्लबने म्हटले आहे.

# वीज नसलेल्या भागांत पुन्हा पाणी सोडा !

### माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे यांचे निवेदन; तलावाच्या कामाची माहिती जाहीर करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील पाणीपुरवठ्याच्या नियोजनात वीज वितरणाचा विचार करणे आवश्यक असून, वीज नसल्यामुळे ज्या भागांतील नागरिकांना पाणी मिळाले नाही, त्या भागांत पुन्हा पाणी सोडावे. तसेच पालकमंत्र्यांची भेट घेऊन श्रीरामपूरकरांसाठी पिण्याच्या पाण्याचे एक आवर्तन सोडण्याची मागणी करावी, अशी मागणी श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष संजय ज. छल्लारे यांनी केली आहे. शहरात दर बुधवारी एकदाच पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेताना नगरपालिका आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वय साधला होता का, असा सवाल छल्लारे यांनी उपस्थित केला आहे. पाणी सोडण्याच्या दिवशी वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना पाणी भरणे शक्य होत नाही. अनेक घरांमध्ये नळाला पाणी येत असले, तरी पुरेशा दाबाअभावी मोटारीशिवाय पाणी भरणे कठीण होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

नगरपालिकेने पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करण्यापूर्वी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून वीजपुरवठ्याचे योग्य नियोजन करायला हवे होते. निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी एवढी घाई का करण्यात आली, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. पाणीपुरवठ्याबाबत कोणताही बदल करायचा असल्यास नागरिकांना किमान चार ते पाच दिवस आधी सूचना देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

श्रीरामपूर शहराला यापूर्वी वर्षभर नियमित पाणीपुरवठा करणारे शहर म्हणून ओळखले जात होते. मात्र, आज पाण्याच्या प्रश्नाला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. भंडारदरा धरणात पाणी उपलब्ध असताना शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना का करावा लागत आहे, याची वस्तुस्थिती प्रशासनाने स्पष्ट करावी. दुष्काळाचे कारण पुढे करण्याऐवजी पाणी साठवण तलावाच्या कामाची सद्यस्थिती, झालेला खर्च आणि कामाच्या गुणवत्तेबाबतची माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी छल्लारे यांनी केली आहे.

### तलावाच्या कामासाठी राजकीय हस्तक्षेपमुक्त समितीची मागणी

शहरातील पाणी साठवण तलावाच्या कामाची तपासणी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. या समितीत निवृत्त पाणीपुरवठा अभियंता, तांत्रिक माहिती असलेली व्यक्ती, सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी, वकील आणि डॉक्टर यांचा समावेश करावा. समितीने तलावाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक बाबींची तपासणी करावी आणि वस्तुस्थिती नागरिकांसमोर मांडावी. समितीत राजकीय संबंध असलेल्या व्यक्तींचा समावेश करू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

पाणीटंचाईच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने एकत्र येऊन मार्ग काढण्याची गरज आहे. नगरपालिका केवळ पाणी वाचविण्याचे आवाहन करीत असेल, तर नागरिकांना पाणी मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पाणी उपलब्ध झाल्यानंतरच नागरिक त्याची बचत करू शकतील. शहरातील कोणताही नागरिक पाण्यापासून वंचित राहू नये, यासाठी नगरपालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, असे आवाहन माजी उपनगराध्यक्ष संजय ज. छल्लारे यांनी केले आहे.

## बनावट खत प्रकरणाच्या तपासाचा वेग मंदावल्याने संताप!

### कृषी गौरव फर्टिलायझर्स प्रकरणाची एसआयटी किंवा सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिंगणापूर** : नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई येथील पांढरीपूल एमआयडीसी परिसरातील कृषी गौरव फर्टिलायझर्स प्रा. लि. कंपनीवरील कारवाईनंतर तपासाची सद्यस्थिती स्पष्ट होत नसल्याने शेतकरी, व्यापारी आणि ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता विशेष तपास पथक (एसआयटी) किंवा गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

कंपनीवरील कारवाईनंतर तपासात किती प्रगती झाली, किती जणांची चौकशी करण्यात आली आणि पुढील कार्यवाही काय, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. त्यामुळे कृषी विभाग आणि संबंधित यंत्रणांनी तपासाची सद्यस्थिती जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या प्रकरणात खतांचे उत्पादन, पॅकिंग, साठवणूक, वाहतूक आणि विक्री यांची संपूर्ण साखळी तपासण्याची गरज आहे. कंपनीचे संचालक, व्यवस्थापनातील संबंधित व्यक्ती तसेच उत्पादक आणि वितरकांची भूमिका कागदपत्रांच्या आधारे निश्चित करावी. बँक व्यवहार, खरेदी-विक्रीची बिले, जीएसटी नोंदी आणि साठा नोंदवह्यांची पडताळणी करून संशयास्पद व्यवहारांचा शोध घ्यावा, अशी मागणी होत आहे.

**कंपनीपुरती चौकशी नको; संपूर्ण साखळी उघड करा!**

कंपनीच्या तसेच अन्य कंपन्यांच्या नावाने पॅकिंग केलेली खते आढळल्याची माहिती समोर आल्याने प्रकरणाची व्याप्ती तपासण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. जप्त खतांचे नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासले आहेत का, त्यांचे निष्कर्ष काय आहेत आणि संबंधित खतांची विक्री कोणत्या भागांत झाली, याचा तपशील जाहीर करावा, अशी मागणी आहे.

संबंधित खतांमुळे पिकांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी असल्यास त्यांचीही पडताळणी करावी. परवाने आणि गुणवत्ता तपासणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीची चौकशी करावी. कोणालाही प्रभावामुळे अभय न देता ठोस पुराव्यांच्या आधारे दोषींवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांच्या हितासाठी तपास पारदर्शक पद्धतीने करून आतापर्यंतच्या कारवाईचा तपशील प्रशासनाने जाहीर करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## संजीवनी अकॅडमीमध्ये ‘एरोबे स्किल लॅब’चे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संजीवनी अकॅडमी येथे अत्याधुनिक ‘एरोबे स्किल लॅब’चे उद्घाटन करण्यात आले. या लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एरोमॉडेलिंग, रोबोटिक्स तसेच स्टेम (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरींग आणि गणित) शिक्षणाचे प्रत्यक्ष अनुभवाधारित प्रशिक्षण मिळणार आहे. संजीवनी विद्यापीठाचे अध्यक्ष अमित कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून साकारलेला व संचालिका डॉ. मनालीताई कोल्हे यांच्या प्रयत्नातुन हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि संशोधनवृत्ती विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांनी या उपक्रमाचे स्वागत करून कौतुक केले. ‘एरोबे स्कील लॅब’ ही अनुभवाधारित आणि कौशल्याधिष्ठित शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

## कोकणगाव - शिवापूर परिसरात पाणीटंचाईची समस्या ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील कोकणगाव -शिवापूर परिसरात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच प्रत्येक प्रभागातील पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, जर पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढून तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा कोकणगाव शिवापूर येथील ग्रामस्थांसह महिलांनी ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

सध्या पाऊस नसल्यामुळे सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होऊ लागले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे नदीला पाणी असतानाही ग्रामपंचायत प्रशासन पाण्याचे योग्य नियोजन करत नाही त्यामुळे पाणी टंचाईचाला आम्हा सर्व ग्रामस्थांसह महिलांना सामोरे जावे लागत आहे गावाला पाणीपुरवठा कधी होणार, किती वेळ पाणी मिळणार आणि कोणत्या प्रभागात कोणत्या दिवशी पाणी सोडले जाणार, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने ग्रामस्थां मध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे .

पाण्याची समस्या गंभीर होत असताना मात्र ग्रामपंचायत प्रशासनाने ठोस उपाययोजना करत नाही तसेच पाणीपुरवठ्याचे कुठलेच वेळापत्रक ग्रामपंचायत प्रशासनाकडे नाही त्यामुळे त्यांनी पाणी सोडण्याचे वेळापत्रक लवकरात लवकर जाहीर करावे अशी मागणी ग्रामस्थ आणि महिलांनी केली आहे.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल निर्मला लक्ष्मण डहाळे यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहिर नोटीस देण्यात येते की, मौजे गिडेगांव, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. ६ क्षेत्र ०७ हे ८० आर पो.ख. ०२ आर आकार १५ रु. १० पै. यापैकी निलेश शिवाजी साळुंके यांचे मालकीची ०० हे ९० आर क्षेत्र असून यापैकी ०० हे ७० आर क्षेत्राची चर्तुसिमा पुर्वेस गटापैकी निलेश शिवाजी साळुंके यांचे उर्वरित क्षेत्र, दक्षिणेस :- वहिवाटीचा रस्ता व शिवाजी साळुंके क्षेत्र, पश्चिमेस गट नं. ६ पैकी संगिता साळुंके यांचे क्षेत्र, उत्तरेस गट नं. ६ पैकी ज्योती मते यांचे क्षेत्र अशी चर्तुसिमापुर्वक मिळकत असून सदरची मिळकत ही निलेश शिवाजी साळुंके यांच्या नावावर असुन त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीत असून आमचे अशिल व त्यांच्यामध्ये जमिनीच्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे सौदा होवून विक्री करण्याचे ठरलेले आहे.

सदर जमिन मालकांनी वरील जमिन निर्वेध व र्निजोखमी व निष्कर्जी आहे. तसेच सदर जमिनीचे लीगल टायटल व पझेशन त्यांचे आहे याबाबत त्यांनी आमचे अशिल यांना विश्वास, हमी व भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्तीचा वरील मिळकतीबाबत काही कायदेशीर मालकी कब्जेवहिवाट, तसेच काही अधिकार असल्यास तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचे बक्षिसपत्र, गहाणपत्र, लिन डिड, लिज डीड, साठेखत, शर्तखरेदीखत, मृत्यूपत्र इत्यादी हक्क व अधिकार असल्यास, तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे, सहकारी बँकेचे, सोसायटी अथवा पतसंस्था किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचे तसेच हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वारसा हक्क, पोटगी हक्क, तसेच इतर कोणतेही हक्क व अधिकार असल्यास त्याबाबत संबंधित इसम अथवा संस्थेने त्याबाबतची सर्व कागदपत्रे व पुराव्यानिशी ८ दिवसाच्या आमच्या कार्यालयात येवुन तशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा कोणत्याही संस्थेचे अगर व्यक्तीची हरकत नाही असे समजुन आमचे अशिल हे वर नमुद मिळकतीचा व्यवहार करुन घेतील व त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची अथवा संस्थेची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. मग त्याचे होणारे परिणामाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाही.

ही जाहिर नोटीस दिली असे.
नेवासा
दिनांक :- २८/१०/२०२६

ॲड.डि.आर.धिर्डे
नेवासा कोर्ट
मोबा नं. ८८३०३३१६४२



### जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहिर नोटीस देण्यात येते की, मौजे खडका, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. ७८/२ क्षेत्र ०१ हे ०२ आर, आकार ०१ रु. ०० पै तसेच गट नं. ७८/३ क्षेत्र ०१ हे ०२ आर, आकार ०१ रु. २० पै. अशी एकुण ०२ हे ०४ आर असून सदर क्षेत्राची चर्तुसिमा पुर्वेस :-अनिल दामु महानोर यांची जमिन, दक्षिणेस शिवरस्ता, पश्चिमेस अकिल शेख यांची जमिन, उत्तरेस :- दत्तु कराडे यांची जमिन अशी चर्तुसिमापुर्वक मिळकत असून सदरची मिळकत ही सुनिल भाऊसाहेब गोसावी यांच्या नावावर असुन त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीत असून आमचे अशिल व त्यांच्यामध्ये जमिनीच्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे सौदा होवून विक्री करण्याचे ठरलेले आहे.

सदर जमिन मालकांनी वरील जमिन निर्वेध व र्निजोखमी व निष्कर्जी आहे. तसेच सदर जमिनीचे लीगल टायटल व पझेशन त्यांचे आहे याबाबत त्यांनी आमचे अशिल यांना विश्वास, हमी व भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्तीचा वरील मिळकतीबाबत काही कायदेशीर मालकी कब्जेवहिवाट, तसेच काही अधिकार असल्यास तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचे बक्षिसपत्र, गहाणपत्र, लिन डिड, लिज डीड, साठेखत, शर्तखरेदीखत, मृत्यूपत्र इत्यादी हक्क व अधिकार असल्यास, तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे, सहकारी बँकेचे, सोसायटी अथवा पतसंस्था किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचे तसेच हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वारसा हक्क, पोटगी हक्क, तसेच इतर कोणतेही हक्क व अधिकार असल्यास त्याबाबत संबंधित इसम अथवा संस्थेने त्याबाबतची सर्व कागदपत्रे व पुराव्यानिशी ८ दिवसाच्या आमच्या कार्यालयात येवुन तशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा कोणत्याही संस्थेचे अगर व्यक्तीची हरकत नाही असे समजुन आमचे अशिल हे वर नमुद मिळकतीचा व्यवहार करुन घेतील व त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची अथवा संस्थेची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. मग त्याचे होणारे परिणामाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाही.

ही जाहिर नोटीस दिली असे.
नेवासा
दिनांक :- २८/१०/२०२६

ॲड.डि.आर.धिर्डे
नेवासा कोर्ट
मोबा नं. ८८३०३३१६४२



नेमलेली ता. ०७-१२-२०२६ वारसप्रमाण पत्राबद्दल जाहिरनामा नि-६
ॲड. बी.एस. काळे
दि.२८.१०.२०२६

### सायटेशन नोटीस

**नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब सि.डी. यांचे कोर्टात**
वारस चौकशी अर्ज नं. ११८/२०२६

**अर्जदार-**१. प्रमोद संभाजी शिंदे वय ३८
२. जान्हवी प्रमोद शिंदे वय ३६
३. हर्षवर्धन विनोद शिंदे वय १४ अपाक जनक आई जान्हवी प्रमादे शिंदे नं. १ ते ३ धंदा शेती, रा. सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
४. प्रियंका शामराव पवार वय ४२ धंदा शेती, रा. लासलगांव, ता.लासलगांव, जि. नाशिक
सामनेवाला-कोणीही नाही.
मयत नामे- लक्ष्मीबाई बाबुराव शिंदे मयत दि. २५.०७.२०१०
मयत नामे- संभाजी बाबुराव शिंदे मयत दि. २५.०५.२००८
मयत नामे सुनंदा संभाजी शिंदे मयत दि. ०३.१०.२००६
मयत नामे- विनोंद संभाजी शिंदे मयत दि. २६.०५.२०२१

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं. ११८/२०२६ दाखल केलेला आहे. मयत लक्ष्मीबाई बाबुराव शिंदे हया दि. २५.०७.२०१० रोजी मौजे सोनई येथे मयत झालेल्या आहे. त्यापुर्वी त्यांनी दत्तक पुत्र म्हणुन दि.१०.१०.१९८५ रोजी संभाजी बाबुराव शिंदे यांना दत्तक घेतले होते. ते दि.२५.०५.२००८ रोजी मयत झाले व त्यापुर्वी त्यांची पत्नी नामे सुनंदा संभाजी शिंदे हया दि. ०३.१०.२००६ रोजी मयत झालेले तर संभाजी व सुनंदा यांचा मुलगा विनोद संभाजी शिंदे हे दि.२६.०५.२०२१ रोजी मौजे पुणे येथे मयत झालेला आहे. तर सदर कुटुंबाचे मुळ पुरुष बाबुराव दगडु शिंदे हे सन १९७२ ते १९७३ दरम्यान मयत झालेले आहे. वरील मयत यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच वारस आहे. तर अर्जदार नं. २ जान्हवी यांचा विवाह मयत विनोद यांच्याशी झाला होता. त्यांच्या लग्न संबंधातुन अर्जदार नं. ३ मुलगा हर्षवर्धन हा झालेला आहे. विनोद मयत झाल्यानंतर अर्जदार नं. २ हिचा विवाह अर्जदार नं. १ प्रमोद यांच्या सोबत झालेला आहे. प्रमोद व मयत विनोद हे सख्खे भाऊ होते. मयतास अर्जदार यांचे व्यतिरीक्त कोणीही वारस नाही. मयत लक्ष्मीबाई बाबुराव शिंदे यांचे नावे मौजे सोनई, ता. नेवासा येथे सिटी सर्व्हे नंबर १३०२, १३०३ व ग्रामपंचायत मिळकत नंबर १४८६ हया मिळकती आहे. सदर मिळकतीस वारस नोंद करणे कामी अर्जदार यांनी अर्ज दाखल केला होता. सदरचे मिळकतीस अर्जदार हेच वारस आहे. सदर मिळकतीस अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि. पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवुन हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजुन मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयताचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे. पुढील नेमलेली तारीख

**हुकूमावरुन**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, नेवासा**

**हुकूमावरुन**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, नेवासा**

शिक्का

# महाविकास आघाडीचा नगरपरिषदेवर हंडा मोर्चा!

## प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड शहरात आतापासूनच पाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली असून, नागरिकांना १० ते १२ दिवसांनी पाणी मिळत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू असून, महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आ. रोहित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षासह महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्षाच्या वतीने जामखेड नगरपरिषदेवर हंडा मोर्चा काढण्यात आला. यावेळी महिला भगिनी हातात हंडे घेऊन मोर्चात सहभागी झाल्या. पाण्याच्या प्रश्नावर महिला आक्रमक झाल्या असून, त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली. शहरात दर ५ ते ६ दिवसांनी पाणीपुरवठा करावा आणि उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

जामखेड शहराचा पाणीप्रश्न कायमचा सोडवण्यासाठी दहीगाव ते जामखेड पाणीपुरवठा योजनेचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. या योजनेत शहरातील सात वाड्या-वस्त्यांचा समावेश आहे. मात्र, योजनेचे काम पूर्ण झालेले नसल्याने नागरिकांना पाण्याच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागा निश्चित करून पुढील कामे लवकर पूर्ण करावीत, संबंधित विभागांची बैठक घेऊन काम पूर्ण करण्याची कालमर्यादा ठरवावी आणि केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली. सध्या राज्यभर दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण होत असताना जामखेडमध्येही पाण्याची टंचाई आतापासूनच जाणवू लागली आहे. अजून हिवाळा आणि उन्हाळ्याचा मोठा कालावधी बाकी आहे. त्यामुळे आताच पाण्याचे योग्य नियोजन केले नाही, तर पुढील काळात जामखेडकरांना पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागेल आणि पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागतील, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

या मोर्चावेळी तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर, शहाजी राळेभात, युवक अध्यक्ष प्रशांत राळेभात, माजी नगराध्यक्ष निखिल घायतडक, नगरसेवक वसीम सय्यद, नगरसेवक राजेंद्र गोरे, नगरसेविका प्रिती राळेभात, नगरसेविका हिना सय्यद, नगरसेविका मेहरुणीसा कुरेशी, शिवसेना (उ. बा. ठा.) तालुकाध्यक्ष ड. मयुर डोके, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कुंडल राळेभात, आपचे तालुकाध्यक्ष . संतोष नवलाखा, प्रहारचे तालुकाध्यक्ष. नयुम सभेदार, पोले नाना, कल्लू चाचा, युवा उद्योजग रमेश आजबे,उद्योजग मंगेश आजबे, अर्चना संपत राळेभात, अनुराधा अडाले, बजरंग डूचे, माजीत कुरेशी, मनोज राळेभात, प्रकाश काळे, शरद शिंदे, महेंद्र राळेभात, रामहरी गोपाळघरे, दादाराजे भोसले, बिभिषण परकड, कांतिलाल वाळूजकर, अमर चाऊस, रावसाहेब जाधव, वसीम शेख, हरिभाऊ आजबे, संदीप गायकवाड, अण्णा मोरे, संदीप अडाले आणि दादा महाडिक यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक आणि महिला भगिनी उपस्थित होत्या. जामखेडकरांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच जागे होऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करावे, नियमित पाणीपुरवठा सुरू करावा आणि दहीगाव-जामखेड पाणीपुरवठा योजनेचे काम ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## द•ख•ल

### दारूच्या नशेत वडिलांना लोखंडी वस्तूंने व दगडाने मारहाण

**अहिल्यानगर :** शहरात दारूच्या नशेत पित्याला मारहाण केल्याची घटना रामवाडी परिसरात घडली असून, पैसे परत मागितल्याच्या रागातून पोटच्या मुलाने व सुनेने मिळून वृद्ध पित्याला गंभीर मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी सुरेश माधु गायकवाड हे महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून नोकरी करत असून ते रामवाडी येथे पत्नीसह राहतात. त्यांचा मुलगा राम सुरेश गायकवाड हा पत्नी माधुरी राम गायकवाड हिच्यासह शेजारीच राहण्यास आहे. फिर्यादीने मुलगा राम याला काही महिन्यापूर्वी दोन लाख रुपये दिले होते. ही रक्कम परत मागितल्याचा राग मनात धरून दिनांक २५ रोजी रात्री आठ वाजता मुलगा राम हा दारू पिऊन घरी आला. त्याने वडिलांना शिवीगाळ करत लोखंडी टनक वस्तूने डाव्या पायाच्या नडगीवर मारून जखमी केले. यावेळी त्याची पत्नी माधुरी हिने हातामध्ये दगड घेऊन साध्याच्या तोंडावर मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या आईला देखील धक्काबुक्की करण्यात आली. तसेच पैसे परत मागितल्यास तलवारीने जीवे मारण्याची धमकी दिली. या हल्ल्यात जखमी झालेल्या वृद्धाने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले असून, तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून राम सुरेश गायकवाड व माधुरी राम गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### भाजपा वाहतूक सेलच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी शिंदे यांची नियुक्ती

**अहिल्यानगर :** भाजपा प्रणित नवभारतीय शिववाहतूक संघटना/ भाजपा वाहतूक सेलच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब बाबुराव शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अराफात शेख यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. बाबासाहेब शिंदे यांच्या निवडीबद्दल अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




पालकमंत्री विखे यांनी वाहतूकदारांच्या हिताचे रक्षण करणे, त्यांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांना शासना पर्यंत पोहचवून ते प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना नवनियुक्त जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बाबुराव शिंदे यांनी वाहतूकदारांच्या न्याय्य हक्कांसाठी सदैव तत्पर राहून काम करण्याची ग्वाही दिली. संघटनेने आपल्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असून, वाहतूकदारांच्या हिताला प्राधान्य देत त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी योगदान देणार आहे. जिल्ह्यातील वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकांच्या प्रश्नांना संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे सोडविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या नियुक्तीबद्दल भाजपाच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी बाबासाहेब शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# अल्पवयीन सावत्र मुलीवर अत्याचार

### बापाविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील बोल्हेगाव परिसरात एका अल्पवयीन १३ वर्षीय मुलीवर तिच्याच नराधम सावत्र बापाने वेळोवेळी बळजबरीने अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आरोपी पतीविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आणि आरोपी दत्तात्रय धोंडीभाऊ वाकळे (रा. मोरया पार्क, बोल्हेगाव) यांचा विवाह झाला होता. लग्नानंतर फिर्यादीची १३ वर्षीय मुलगी ही देखील त्यांच्यासोबत राहत होती. आरोपीने पीडित मुलीचे वय अल्पवयीन असल्याचे व ती नात्याने आपली सावत्र मुलगी असल्याचे माहीत असतानाही तिच्यावर कुकर्म केले. वारंवार बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. नुकतीच ती आजीसोबत बाहेरगावी गेली असता आरोपीने तिचा पाठलाग केला आणि बोल्हेगावला परतत असताना हॉटेलमध्ये जाण्यास दबाव टाकला. मुलीने नकार दिल्याने आरोपीने तिला शिवीगाळ करत दमदाटी केली.

आरोपीच्या सततच्या त्रासामुळे आणि जीवे मारण्याच्या धमकीमुळे अल्पवयीन मुलगी प्रचंड दबावाखाली होती. अखेरीस तिने घडलेला सर्व प्रकार आपल्या आईला सांगितला. आईने तातडीने धाव घेत तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी आरोपी दत्तात्रय वाकळे याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

# ‘एआय’ मनुष्याचा डिजिटल असिस्टंट

## आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून आयोजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे मनुष्याचे डिजिटल असिस्टंट म्हणून काम करत आहे. एआयमुळे कामकाजातील वेळेची बचत होऊन विविध प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद करता येतात. त्यामुळे या तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज दूर करून प्रत्येकाने त्याचा योग्य वापर शिकणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन लेखक व व्याख्याते विवेक मेहत्रे यांनी केले.



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ‘कार्यालयीन कामकाजात एआयचा वापर’ या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, पुष्कर कुलकर्णी, करण कराळे, उपायुक्त मेहर लहारे, शहर अभियंता मनोज पारखे, अशोक साबळे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, तडवी यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विवेक मेहत्रे म्हणाले की, देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या काळात संगणकाचा वापर सुरू झाला, तेव्हाही कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, संगणक मानवाशी स्पर्धा करण्यासाठी आले नव्हते, तर कामकाज सुलभ व्हावे, कामे जलद गतीने पूर्ण व्हावीत आणि जगभरातील लोकांशी संपर्क साधता यावा, यासाठी त्याचा वापर सुरू झाला. एखाद्या तंत्रज्ञानाची पुरेशी माहिती नसताना त्याला विरोध करणे ही मानवी प्रवृत्ती आहे. मात्र, एआय हा आपला शत्रू नसून जीवनात आणि कामकाजात नवीन संधी उपलब्ध करून देणारे साधन आहे.

एआयबाबत अनेक गैरसमज आहेत. ते दूर करून या तंत्रज्ञानाचे फायदे समजून घेणे गरजेचे आहे. मानवानेच कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित केली असून आज एआय आपल्या घरापर्यंत, अगदी स्वयंपाकघरापर्यंत पोहोचला आहे. इंटरनेटचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला असून मोबाईलच्या माध्यमातूनही विविध तंत्रज्ञान सहज उपलब्ध झाले आहे. एआयचा वापर आता सहजपणे करता येत असल्याने प्रत्येकाने नवीन तंत्रज्ञानाची माहिती करून घेऊन ते आत्मसात करणे आवश्यक आहे. एआय ही संकल्पना १९५६ मध्ये चर्चेत आली. आज त्याचा वापर विविध क्षेत्रांत वाढत आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार स्वतः ला अद्ययावत न करणाऱ्यांना रोजगाराच्या क्षेत्रात आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे तंत्रज्ञानाला रोखण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्याचा योग्य आणि जबाबदारीने वापर शिकला पाहिजे.

# निंबळक येथील विद्यालयात मुलींसाठी सॅनिटरी वेंडिंग व डिस्पोजल मशीनचे लोकार्पण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** इसळक-निंबळक येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात कृष्णाप्रीत वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने आणि व्होगनस प्रा इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टीने सॅनिटरी पॅड व्हेन्डिंग मशीन व डिस्पोजल मशीनचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. तसेच शालेय मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वितरण व आरोग्य शिबीराचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. मान्यवरांचे स्वागत विद्यालयाच्या लेझीम पथकाने केले. यावेळी नवदुर्गा शक्तिरूपात सजलेल्या विद्यार्थिनींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या विविध रूपांची उपस्थितांना ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हॉगनास इंडिया प्रा. लि.चे प्लांट हेड शरद मगर होते. कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे संचालक प्रशांत पाटील शेळके तसेच संस्थेचे सहसचिव अविनाश कोतकर, जगताप हॉस्पिटलच्या वैद्यकीय मार्गदर्शक डॉ. नयना जगताप, सेवानिवृत्त सिव्हिल हॉस्पिटल मेट्रन छायाताई निमसे, एमआयडीसीतील उद्योजक राजेंद्र गायकवाड, कु. वृषाली अबुज, सरपंच प्रियंका लामखडे, मेजर भागवत शेळके, मेजर रावसाहेब शेळके, उद्योजक सुनील शिंदे, आरोग्य अधिकारी आकाश बोरबने आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. नयना जगताप यांनी विद्यार्थिनींना ‘कळी उमलताना’ या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. किशोरवयातील शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळीविषयी योग्य माहिती, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि या विषयांबाबत असलेले गैरसमज दूर करण्याचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. तसेच विद्यार्थिनींनी कोणताही संकोच न बाळगता आरोग्यविषयक समस्यांबाबत जागरूक राहावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात शरद मगर यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक गरजा, वैयक्तिक स्वच्छता आणि शिक्षणातील आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले.

# दिव्यांगांच्या स्वयंरोजगारासाठी विशेष प्रशिक्षण शिबिर घ्या; सावली दिव्यांग संघटनेची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** दिव्यांग व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे, यासाठी त्यांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण व आवश्यक प्रशिक्षण प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याकरिता विशेष शिबिर आयोजित करावे, अशी मागणी चाँद कादर शेख अध्यक्ष सावली दिव्यांग संघटना, शेवगाव यांच्या वतीने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक दिव्यांग व्यक्तींमध्ये स्वयंरोजगार करण्याची इच्छा व क्षमता आहे. मात्र, व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य प्रशिक्षण, प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि शासकीय योजनांची पुरेशी माहिती उपलब्ध होत नसल्याने अनेक दिव्यांग व्यक्तींना आर्थिक स्वावलंबनाच्या संधींपासून वंचित राहावे लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन संघटनेने जिल्हा प्रशासनाकडे विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याची मागणी केली असल्याचे सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापूरे यांनी सांगितले.

या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना शिवणकाम, भरतकाम, किराणा दुकान, स्टेशनरी दुकान, ब्युटी पार्लर, मोबाईल दुरुस्ती, अगरबत्ती निर्मिती तसेच इतर लघुउद्योग व घरगुती व्यवसायांसाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर संबंधित प्रशिक्षण प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सावली दिव्यांग संघटनेचे सचिव नवनाथ औटी यांच्याकडून करण्यात आली आहे. स्वयंरोजगारासाठी इच्छुक दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांची माहिती, व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि उपलब्ध आर्थिक सहाय्य मिळविण्याच्या प्रक्रियेची माहिती देण्यात यावी. जिल्हा व तालुका स्तरावरील संबंधित शासकीय विभाग, कौशल्य विकास विभाग, जिल्हा उद्योग केंद्र आणि प्रशिक्षण संस्थांच्या समन्वयातून हे शिबिर आयोजित करावे, असे सावली दिव्यांग संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्ष निर्मला भालेकर यांनी प्रतिक्रिया दिल्या आहे. दिव्यांग व्यक्तींना केवळ योजनांची माहिती देण्यापुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्ष व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. जिल्हा प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून इच्छुक दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष प्रशिक्षण व प्रमाणपत्र शिबिर आयोजित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती सावली दिव्यांग संघटनेच्या वतीने बाबासाहेब महापुरे, चाँद शेख, नवनाथ औटी, निर्मला भालेकर, बाहुबली वायकर, सोनाली चेडे, बाबासाहेब गडाख, खलील शेख, संदीप चेडे, अनिल विघ्ने, किशोर मडके, ताराचंद पिवळ, महेबूब शेख, शिवाजी आहेर, गणेश महाजन, सुनील वाळके, गणेश तमानके, संजीवनी आदमने, अंजना चेडेसह दिव्यांग बांधवाकडून करण्यात येत आहे.

# वीज कंत्राटी कामगारांचा एल्गार! महावितरण कार्यालयासमोर निदर्शने

## ६ नोव्हेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महावितरण कंपनीतील कंत्राटी वीज कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या (संलग्न भारतीय मजदूर संघ) वतीने अहिल्यानगर येथील महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन व निदर्शने करण्यात आली. प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास येत्या ६ नोव्हेंबर २०२६ पासून राज्यभर बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रकाशगड, कामगार आयुक्त कार्यालय तसेच राज्यभरातील स्थानिक झोन व सर्कल कार्यालयांसमोर काळ्या फिती लावून लाक्षणिक निदर्शने करण्यात आली. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथेही कामगारांनी एकत्र येत आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवला. यावेळी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगोळे, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष अनिल नजन, सर्कल सचिव गणेश कुंभारे, वीज कंत्राटी कामगार महासंघाचे जिल्हाध्यक्ष कृष्णा साठे, प्रदेश सचिव सचिन पाटील, जिल्हा कोषाध्यक्ष आशिष डहाने, संघटन मंत्री इतेश देठे, दीपक चौधरी, संतोष शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार सहभागी झाले होते.

महावितरणमध्ये नियमित रिक्त पदांवर काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन मिळत नसल्याची तक्रार संघटनेने केली आहे. क्रिस्टल व स्मार्ट एजन्सीमार्फत कार्यरत कामगारांच्या वेतनात मोठी तफावत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. दिवाळीपूर्वी वेतनातील हा फरक दूर करून संबंधित कामगारांना थकीत रक्कम देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. एका डिव्हिजनमध्ये १० ते १५ कंत्राटदारांना काम दिले जात असल्याने प्रशासकीय गुंतागुंत वाढते आणि कामगारांच्या वेतनास विलंब होतो, असा आरोप संघटनेने केला. कंत्राटदारांकडून होणारे कथित आर्थिक व मानसिक शोषण थांबवून कामगारांना न्याय द्यावा, अशीही मागणी करण्यात आली. वीज क्षेत्रात जोखमीच्या परिस्थितीत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना किमान १० लाख रुपयांचे अपघात विमा संरक्षण व मेडिक्लेम योजना लागू करावी, अशी प्रमुख मागणी आहे.

याशिवाय नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे पेट्रोल भत्ता, मोबाईल रिचार्ज भत्ता, नाईट शिफ्ट भत्ता, खाकी गणवेश आणि धुलाई भत्ता देण्यात यावा तसेच क्रिस्टल व स्मार्ट या एजन्सीच्या मार्फत काम करत असलेले कंत्राटी कामगार व नियमित मजूर रिक्त पदावर कार्यरत कामगार यांच्या वेतनात फार मोठा फरक आहे हा फरक असताना राज्य कामगार उपायुक्त चेतन जगताप यांनी दिलेल्या आदेशानुसार दिवाळीपूर्वी हा पगार २१ हजार रुपये करून मागील सर्व फरक मिळावा तसेच वर्षभर कामगारांना कधीच वेळेत पगार मिळाला नाही.


**सायटेशन नोटीस**

नि-६
अ‍ॅड. बी.एस. काळे
दि.२८.१०.२०२६

**वारसप्रमाण पत्राबद्दल जाहिरनामा**

**नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब सि.डी. यांचे कोर्टात**

वारस चौकशी अर्ज नं. ११८/२०२६
नेमलेली ता. ०७-१२-२०२६

**अर्जदार**
१. प्रमोद संभाजी शिंदे वय ३८
२. जान्हवी प्रमोद शिंदे वय ३६
३. हर्षवर्धन विनोद शिंदे वय १४ अपाक जनक आई जान्हवी प्रमोद शिंदे नं. १ ते ३ धंदा शेती, रा. सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
४. प्रियंका शामराव पवार वय ४२ धंदा शेती, रा. लासलगांव, ता. लासलगांव, जि. नाशिक

**सामनेवाला**
**कोणीही नाही.**

मयत नामे- लक्ष्मीबाई बाबुराव शिंदे मयत दि. २५.०७.२०१०
मयत नामे- संभाजी बाबुराव शिंदे मयत दि. २५.०५.२००८
मयत नामे- सुनंदा संभाजी शिंदे मयत दि. ०३.१०.२००६
मयत नामे- विनोंद संभाजी शिंदे मयत दि. २६.०५.२०२१

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं. ११८/२०२६ दाखल केलेला आहे. मयत लक्ष्मीबाई बाबुराव शिंदे ह्या दि. २५.०७.२०१० रोजी मौजे सोनई येथे मयत झालेल्या आहे. त्यापुर्वी त्यांनी दत्तक पुत्र म्हणून दि.१०.१०.१९८५ रोजी संभाजी बाबुराव शिंदे यांना दत्तक घेतले होते. ते दि.२५.०५.२००८ रोजी मयत झाले व त्यापुर्वी त्यांची पत्नी नामे सुनंदा संभाजी शिंदे ह्या दि. ०३.१०.२००६ रोजी मयत झालेले तर संभाजी व सुनंदा यांचा मुलगा विनोद संभाजी शिंदे हे दि. २६.०५.२०२१ रोजी मौजे पुणे येथे मयत झालेला आहे. तर सदर कुटुंबाचे मुळ पुरुष बाबुराव दगडु शिंदे हे सन १९७२ ते १९७३ दरम्यान मयत झालेले आहे. वरील मयत यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच वारस आहे. तर अर्जदार नं. २ जान्हवी यांचा विवाह मयत विनोद यांच्याशी झाला होता. त्यांच्या लग्न संबंधातुन अर्जदार नं. ३ मुलगा हर्षवर्धन हा झालेला आहे. विनोद मयत झाल्यानंतर अर्जदार नं. २ हिचा विवाह अर्जदार नं. १ प्रमोद यांच्या सोबत झालेला आहे. प्रमोद व मयत विनोद हे सख्खे भाऊ होते. मयतास अर्जदार यांचे व्यतिरीक्त कोणीही वारस नाही. मयत लक्ष्मीबाई बाबुराव शिंदे यांचे नावे मौजे सोनई, ता. नेवासा येथे सिटी सर्व्हे नंबर १३०२, १३०३ व ग्रामपंचायत मिळकत नंबर १४८६ ह्या मिळकती आहे. सदर मिळकतीस वारस नोंद करणे कामी अर्जदार यांनी अर्ज दाखल केला होता. सदरचे मिळकतीस अर्जदार हेच वारस आहे. सदर मिळकतीस अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि. पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवुन हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजुन मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयताचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील. आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे.
पुढील नेमलेली तारीख

सही/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय क.स्तर, नेवासा

शिक्का

हुकूमावरुन
सही/-
अधिक्षक दिवाणी न्यायालय स्तर, नेवासा

## दखल



### सुरक्षित बालपण अभियानातून विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन

**आळे फाटा :** तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्यावतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इनामवाडी(ता. जुन्नर )येथे सुरक्षित बालपण अभियानाअंतर्गत कायदेविषयक शिबीर उत्साहात पार पडले.

सोमवारी (दि. २७) सकाळी १०.३० वाजता हे शिबीर झाले. जिल्हा न्यायाधीश-१ तथा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.यावेळी पुराणिक नलावडे, तब्बसुम पठाण,ऐश्वर्या लांडे यांनी बालकांचे अधिकार, पोक्सो कायदा, ऑनलाईन सुरक्षितता व मोफत कायदेशीर मदत यावर मार्गदर्शन केले. यावेळी समन्वयक प्रशांत मोरतळे, सरपंच दत्तात्रय ताजणे, मुख्याध्यापक प्रवीण डोंगरे, बाळासाहेब मोरे, शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.प्रास्ताविक प्रशांत मोरतळे, सूत्रसंचालन बाळासाहेब मोरे तर आभार प्रवीण डोंगरे यांनी मानले.

### कवठे येमाई तील बारा माऊ बलुतेदार मंडळाचे कार्य गौरवास्पद

**कवठे येमाई :** शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावातील सामाजिक सलोखा जपत सर्व समाजघटकांना सोबत घेऊन गावाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या बाराभाऊ बलुतेदार मंडळाचे योगदान गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांनी केले.

कवठे येमाई येथे कोजागिरी पौर्णिमा आणि ग्रामदैवत येमाई देवीच्या पालखी सोहळा निमित्त रविवारी (दि. २५) उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. आकर्षक फुलांनी सजविलेल्या पालखीत देवीची मूर्ती विराजमान करण्यात आली होती. पालखी सोहळ्यानंतर बाराभाऊ बलुतेदार समाजातील युवक, युवती आणि विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीसाठी गावात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक एकोपा, परंपरा जपणे आणि गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आमदार असताना पोपटराव गावडे यांनी गावातील शालेय शिक्षण घेतलेल्या जुन्या आठवणींना उजाळा देत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.यावेळी माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोखले, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, पंचायत समिती सदस्य कांचन सांडभोर, शिरूरच्या माजी नगराध्यक्षा मनीषा गावडे, पोलीस निरीक्षक सुहास रोकडे, पांडुरंग भोर, प्रकाश काका जोशी यांच्यासह बाराभाऊ बलुतेदार मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंचर-लोणी रस्त्यावरील जळीत ट्रक हटवा!



लोणी धामणी : आंबेगाव तालुक्यातील मंचर-लोणी रस्त्यावर सोमवार (दि. २६) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ट्रकला आग लागून तो पूर्णपणे जळून खाक झाला. मात्र, घटनेला तीन दिवस उलटूनही हा जळीत ट्रक लोणीजवळ रस्त्यालगत उभाच असल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने हा ट्रक हटवावा, अशी मागणी वाळुंजनगरचे माजी सरपंच महेंद्र वाळुंज यांनी केली आहे.

# दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार : मुख्यमंत्री

## अखिल भारतीय किसान सभेच्या विविध मागण्यांबाबत बैठक

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**पुणे/मुंबई :** सध्या राज्यात असलेल्या संघर्षमय दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्य शासन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करत आहे.राज्य शासनाच्या मदतीतून हा दुष्काळाचा संघर्ष निश्चितच कमी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखिल भारतीय किसान सभेच्या मागण्यांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत व्यक्त केला.




बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार विनोद निकोले उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले अडचणीत असलेल्या उपसा सिंचन योजनांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, या निर्णयाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. दुष्काळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्यात येईल. या अग्रिमामुळे शेतकऱ्यांना 'एनडीआरएफ'च्या निकषांपेक्षा अधिक मदत मिळणार आहे. दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करून चारा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नमो शेतकरी सन्मान निधी योजनेचे हप्ते शेतकऱ्यांना देण्यात येतील. नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना शासन प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देत आहे. या अनुदानात वाढ करण्याबाबत कर्जमाफीसाठी गठित मंत्रिगट चर्चा करेल आणि आर्थिक परिस्थितीनुसार योग्य निर्णय घेण्यात येईल. नवीन पीक कर्ज देताना सिबिलची अट ठेवू नये, यासाठी रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून सर्व बँकांना पत्र देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायसी पूर्ण केलेल्या महिलांना थकीत हप्ता तातडीने देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नवीन लाभार्थी तसेच ई-केवायसी न झालेल्या आदिवासी भागातील महिलांबाबत शासन सकारात्मक विचार करेल. महिलांसाठी योजना राबविणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक महिलांना लाभ दिला जात आहे.

पीक विम्यासाठी पूर्वी लागू असलेले ट्रिगर पुन्हा सुरू करण्याबाबत संबंधित विभागामार्फत तपासणी करून निर्णय घेण्यात येईल. बाळ हिरड्याची आदिवासी विकास महामंडळामार्फत होणारी खरेदी पूर्ववत करावी आणि या उत्पादनाचा किमान आधारभूत दरामध्ये समावेश करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीस अपर मुख्य सचिव (महसूल) संतोष कुमार, अपर मुख्य सचिव (वने) संजय खंदारे, सचिव (कृषी) परिमल सिंग, अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) लखमी गौतम, कृषी आयुक्त सूरज मांढरे, माजी आमदार जे . पी गावित, तसेच अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ अशोक ढवळे, अध्यक्ष उमेश देशमुख, सरचिटणीस डॉ. अजित नवले आदी उपस्थित होते.



# पशुसंवर्धन विभागाचे काटेकोर नियोजन

## दुष्काळग्रस्त ३०५ तालुक्यांत पशुधनाची 'भारत पशुधन' प्रणालीवर नोंदणी करा

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये घोषित करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पशुधनाची चारा व पाण्याची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी पशुसंवर्धन विभागाने काटेकोर नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळकाळात पशुधनाला आवश्यक असणारा चारा, चारा बियाणे व ठोंबे वाटप, वैद्यकीय उपचार व इतर अनुषंगिक सेवांचा पुरवठा अचूकपणे व्हावा, यासाठी सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची नोंदणी एनडीएलएम, अर्थात 'भारत पशुधन प्रणाली' वर अद्यावत करावी, तसेच नवीन पशुधनाचे टॅगिंग करून नोंदणी करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, मदत कार्य व सवलतींचा लाभ थेट गरजू पशुपालकांच्या पशुधनापर्यंत पारदर्शकपणे पोहोचविण्यासाठी पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित पशुपालकांनी तात्काळ आपल्या परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा. आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी व नवीन पशुधनाच्या कानात १२ अंकी बिल्ला टोचून त्याबाबत नोंद भारत पशुधन प्रणालीवर करण्याबाबतची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे.

> **राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन व संवर्धन करणे ही पशुसंवर्धन विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. प्रत्येक पशुपालकाने आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी आणि टॅगिंग 'भारत पशुधन' प्रणालीवर करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. या डिजिटल नोंदणीमुळे आपत्कालीन परिस्थितीत चारा बियाणे, ठोंबे व इतर मदत अचूकपणे व थेट पात्र पशुपालकापर्यंत पोहोचवणे आम्हाला शक्य होईल. सर्व पशुपालकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा.**
> **- डॉ. किरण पाटील**
> **(भा.प्र.से.) आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे.**

## पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्यात संघटन विस्ताराची मोहीम!

### सदस्य व पदाधिकारी नोंदणी सुरू; आकर्षक किटसह जनसेवेची संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कवठे येमाई :** समाजहित, जनसेवा, कायदेशीर मदत आणि पोलीस व नागरिक यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने पोलीस मित्र संघ महाराष्ट्र यांच्या वतीने सदस्य व पदाधिकारी नोंदणी मोहीम राबविण्यात येत आहे. इच्छुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि जनसेवेची आवड असलेल्या व्यक्तींनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष शाम घाडगे,उपाध्यक्ष प्रा.सुभाष शेटे,राष्ट्रीय महिला अध्यक्षा श्रीमती वर्षाताई नाईक यांनी केले आहे.संघाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, सदस्य व पदाधिकाऱ्यांसाठी विविध नोंदणी पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये ओळखपत्र, पी.व्ही.सी. कव्हर किचन, वाहन स्टिकर, प्रिंटेड लेटर व माहितीपत्रक यांसारख्या साहित्याचा समावेश आहे. उच्चस्तरीय किटमध्ये बॅज, पेन, जॅकेट आदी साहित्याचाही समावेश आहे.देणगी देणाऱ्या सदस्य,पदाधिकाऱ्यांना संघास देणगी दिल्यास कर सवलत प्राप्त होईल.अधिकची देणगी देणाऱ्या व्यक्तीस कर सवलत प्रमाणपत्र उपलब्ध होईल

नोंदणीसाठी आधारकार्डची प्रत, पासपोर्ट आकाराचे एक किंवा दोन फोटो, रक्तगटाची माहिती, संपूर्ण पत्ता व पिनकोड आवश्यक असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे. देणगी शुल्क भरल्यानंतर देणगी पावती किंवा स्क्रीनशॉट पाठविण्याची सूचनाही देण्यात आली आहे.पोलीस मित्र संघाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम, जनजागृती, महिला सक्षमीकरण,बेरोजगारांना रोजगार मिळणे कामी मदत,वंचित,पीडित शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार ,नागरिकांना कायदेशीर मदतीबाबत मार्गदर्शन आणि समाजात सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्य करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.अधिक माहितीसाठी संपर्क : ९२८४३८१६९०, ८५३०१६५९४९,९९७५६७४२८६,

आपले घोषवाक्य : पोलीस मित्र - जनतेचे अस्त्र , सुरक्षित समाजाची आपली जबाबदारी !

### महात्मा जोतीराव फुले महसूल लोकअदालत अभियानास मान्यता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महसूल विभागातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे संबंधित पक्षकारांच्या परस्पर संमतीने व तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी राज्यभर 'महात्मा जोतीराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. हे अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

महसूल व वन विभागाने १३ ऑगस्ट २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. या पार्श्वभूमीवर, विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या लोकअदालतीच्या धर्तीवर दोन्ही पक्षकारांच्या संमतीने महसुली दावे कायमस्वरूपी निकाली काढण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या महसूल लोकअदालतीच्या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन हा उपक्रम राज्यभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### अवसरी खुर्दमध्ये सुगंधित तंबाखूचा साठा जप्त ; १४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथील भोरवाडी परिसरात मंचर पोलिसांनी कारवाई करत प्रतिबंधित पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईत प्रतिबंधित अन्नपदार्थ आणि वाहनासह एकूण १४ लाख ३० हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मंगळवारी, २७ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेदोनच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. नवनाथ कैलास भोर आणि अक्षय लहू भोर यांच्याशी संबंधित घरात तसेच सुजुकी सुपर कॅरी वाहनामध्ये विमल, रजनीगंधा, हिरा, आरएमडी, बिग तंबाखू आणि जाफरानी जर्दा यांसह विविध प्रतिबंधित पदार्थांचा साठा आढळून आला.पोलिसांनी १० लाख ३० हजार ७४० रुपये किमतीचे प्रतिबंधित अन्नपदार्थ आणि चार लाख रुपये किमतीचे वाहन जप्त केले आहे. अन्न सुरक्षा अधिकारी अभिजित अशोक झोडगे यांच्या फिर्यादीवरून मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज वाघमारे करीत आहेत.

# भीमाशंकर अभयारण्यात पुनर्वसन की पर्यावरण संवर्धन?

## विकासाच्या नावाखाली निसर्गाचा समतोल धोक्यात येऊ नये -धनंजय कोकणे मानद वन्य जीव रक्षक पुणे

**नवनाथ फलके । राष्ट्र सह्याद्री**

**डिंबे :** पश्चिम घाटाच्या जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या भीमाशंकर वन्यजीव अभयारण्याच्या परिसरातील प्रस्तावित पुनर्वसन आणि 'हेरिटेज वाडी' प्रकल्पामुळे पर्यावरणीय संवर्धन विरुद्ध स्थानिक विकास हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांचे पुनर्वसन, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व स्वच्छता व्यवस्थापन आणि रोजगारनिर्मिती या उद्देशाने प्रकल्पाची संकल्पना मांडण्यात आली असली, तरी अभयारण्यातील मानवी हस्तक्षेप वाढल्यास त्याचा वन्यजीव आणि नैसर्गिक अधिवासावर काय परिणाम होईल, याचा सखोल विचार होणे आवश्यक आहे.

भीमाशंकर परिसराला धार्मिक महत्त्वाबरोबरच पर्यावरणीयदृष्ट्याही विशेष स्थान आहे. घनदाट वनक्षेत्र, विविध वनस्पती, पक्षी, प्राणी आणि जलस्रोत यामुळे हा परिसर पश्चिम घाटातील महत्त्वाच्या परिसंस्थेचा भाग आहे. त्यामुळे येथे कोणतेही मोठे बांधकाम किंवा पायाभूत सुविधा उभारताना केवळ तात्कालिक गरजा न पाहता दीर्घकालीन पर्यावरणीय परिणामांचा विचार करणे गरजेचे आहे.

प्रस्तावित 'हेरिटेज वाडी'बाबत प्रशासनाच्या माहितीनुसार, मूळ गावापासून सुमारे १५० मीटर अंतरावर साडेदहा एकर क्षेत्रात नियोजनबद्ध वसाहत उभारण्याचा प्रस्ताव आहे. पारंपरिक वास्तुशैली आणि आधुनिक सुविधांचा समन्वय, ग्रामपंचायत कार्यालय, सार्वजनिक सुविधा, सभागृह तसेच स्थानिकांसाठी व्यावसायिक युनिट्स आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. 'विस्थापनाऐवजी पुनर्रचना' या संकल्पनेतून स्थानिकांचे सामाजिक व सांस्कृतिक नाते कायम ठेवण्याचा प्रयत्न असल्याचेही सांगण्यात आले आहे.

मात्र, या प्रकल्पाबाबत पर्यावरणीय प्रश्न उपस्थित करणाऱ्यांचे म्हणणे आहे की, अभयारण्याच्या संवेदनशील परिसरात नवीन वस्ती निर्माण झाल्यास भविष्यात मानवी वर्दळ, वाहनांची संख्या, कचरा, पाणीवापर, सांडपाणी आणि बांधकामाचा दबाव वाढू शकतो. परिणामी वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर आणि त्यांच्या हालचालींच्या मार्गांवर परिणाम होण्याची शक्यता तपासणे आवश्यक आहे.

> **भीमाशंकर परिसरातील विकास आराखडा तयार करताना येथील समृद्ध जैवविविधता, घनदाट जंगल, वन्यजीव आणि पर्यावरणीय संवेदनशीलतेचा प्राधान्याने विचार होणे आवश्यक आहे. विकासाला विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाची हानी होता कामा नये. भीमाशंकरचा विकास हा निसर्गाचे वैभव जपणारा, पर्यावरणपूरक आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणारा असावा**
> **-ॲड. महेश लक्ष्मणराव काळे**

> **शेकरू हा डिसेंबर ते जानेवारी महिन्यात प्रजनन करतो तसेच तो प्रत्येक वर्षी प्रजनन करेल असे काही नाही यामुळे शेकरूंची संख्या झपाट्याने वाढत नाही मात्र भीमाशंकर अभयारण्य हे शेकरूच्या प्रजननासाठी तसेच जतनासाठी सुरक्षित अभयारण्य असल्याने या ठिकाणी शेकरूचे चांगल्या प्रकारे वाढ होताना पाहावयास मिळते. शेकरूची मादी ही सहजासहजी एकाच बछड्याला जन्म देते यामुळे देखील शेकरूची संख्या मर्यादित असते. मात्र जर अभयारण्यामध्येच मनुष्यवस्ती वसविण्यात आली तर त्या ठिकाणी ध्वनी प्रदूषण, सण उत्सवामुळे होणारे प्रदूषण व अवस्था मानवी हस्तक्षेप यामुळे महाराष्ट्राचे मानचिन्ह असणारे शेकरू या या संरक्षित प्राण्याचे संगोपणावर विपरीत परिणाम होईल.**
> **- धनंजय कोकणे मानद वन्यजीव रक्षक पुणे**

विशेषतः भीमाशंकर परिसरात अतिवृष्टीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. डोंगराळ भूप्रदेश, अरुंद जलवाहिन्या आणि मोठ्या प्रमाणातील पावसामुळे पावसाळ्यात पाणी साचणे किंवा अचानक मोठ्या प्रमाणात वाहून जाणे यासारख्या नैसर्गिक परिस्थिती उद्भवू शकतात. त्यामुळे प्रस्तावित बांधकामांच्या ठिकाणी जलनिस्सारण, भूगर्भीय स्थैर्य आणि आपत्ती व्यवस्थापनाचा स्वतंत्र अभ्यास होणे महत्त्वाचे ठरेल.

या पार्श्वभूमीवर पुनर्वसनासाठी पात्र कुटुंबांची निवड हीदेखील पारदर्शक पद्धतीने होणे गरजेचे आहे. कोण खरोखरच स्थानिक रहिवासी आहे, कोणाचे स्वतःचे घर किंवा पर्यायी निवासस्थान आहे, कोण पुनर्वसनासाठी पात्र आहे, याची अधिकृत कागदपत्रांच्या आधारे तपासणी झाली पाहिजे. पुनर्वसनाचा लाभ गरजू आणि पात्र कुटुंबांपर्यंतच पोहोचणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.

त्याचबरोबर प्रकल्पासाठी खर्च होणाऱ्या सार्वजनिक निधीचाही काटेकोरपणे विचार झाला पाहिजे. पुनर्वसनाबरोबरच स्थानिक आदिवासी आणि ग्रामीण नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, रस्ते, रोजगार आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नांनाही समान महत्त्व दिले पाहिजे. पुनर्वसन धोरणात प्रकल्पग्रस्तांच्या गरजा, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, पाणी आणि रोजगाराच्या संधींचा विचार करण्यावर राज्य शासनाने भर दिला आहे.

भीमाशंकरसारख्या संवेदनशील क्षेत्रात कोणतेही काम करताना संबंधित वन्यजीव आणि पर्यावरणीय कायदे, आवश्यक परवानग्या आणि सक्षम प्राधिकरणांच्या मंजुरी यांचे पालन झाले आहे का, याची स्पष्ट माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकल्पाबाबत शंका निर्माण झाल्यास स्वतंत्र तांत्रिक आणि पर्यावरणीय परीक्षण करूनच पुढील निर्णय घेणे अधिक योग्य ठरेल.

यासाठी शासनाने स्थानिक ग्रामस्थ, वन विभाग, वन्यजीव तज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक, प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यात खुले संवादाचे व्यासपीठ निर्माण करावे. प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरणीय परिणाम, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था आणि आपत्ती व्यवस्थापन याबाबतची माहिती नागरिकांसमोर ठेवणे आवश्यक आहे.

भीमाशंकरचा विकास थांबवणे हा या प्रश्नाचा एकमेव मार्ग नाही; मात्र विकास करताना निसर्गाची किंमत मोजावी लागू नये, याची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. धार्मिक पर्यटन आणि स्थानिकांच्या जीवनमानात सुधारणा या गरजा वास्तव आहेत. त्याचवेळी अभयारण्यातील जैवविविधता आणि नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण हीदेखील सार्वजनिक जबाबदारी आहे.म्हणूनच प्रस्तावित पुनर्वसन प्रकल्पाकडे 'विकास विरुद्ध पर्यावरण' अशा संघर्षाच्या चौकटीत न पाहता 'पर्यावरणपूरक आणि पारदर्शक पुनर्वसन' या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. पात्र स्थानिकांचे योग्य पुनर्वसन, सार्वजनिक निधीचा पारदर्शक वापर, कायदेशीर मंजुरींचे पालन आणि अभयारण्याच्या पर्यावरणीय संवेदनशीलतेचे संरक्षण या चारही बाबींचा समतोल साधला तरच भीमाशंकरचा विकास दीर्घकाळ टिकणारा ठरू शकतो.

भीमाशंकर ही केवळ धार्मिक श्रद्धेची भूमी नाही; ती वनसंपदा, जैवविविधता आणि जलव्यवस्थेच्या दृष्टीनेही अत्यंत मौल्यवान परिसंस्था आहे. त्यामुळे आज घेतला जाणारा कोणताही निर्णय पुढील अनेक पिढ्यांवर परिणाम करणारा असेल. विकासाची दिशा ठरवताना हा व्यापक दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवणे हीच काळाची गरज आहे.

### ट्रान्सफॉर्मर फोडून १ लाख ५६ हजार रुपयांच्या तांब्याच्या तारांची चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील करडे येथे स्टेरिऑन कंपनीच्या शेजारील शेड क्रमांक १३ च्या दक्षिणेकडील मोकळ्या जागेत बसविण्यात आलेल्या विद्युत ट्रान्सफॉर्मरचे झाकण उघडून त्यातील सुमारे ५२० किलो वजनाच्या तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली. चोरीस गेलेल्या तारांची किंमत अंदाजे १ लाख ५६ हजार रुपये असून, याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजल्यापासून २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. चोरट्यांनी ६३० केव्हीए क्षमतेच्या विद्युत ट्रान्सफॉर्मरचे झाकण उघडून आतील तांब्याच्या तारा चोरून नेल्या. याप्रकरणी नानासाहेब हरिभाऊ सोनवणे (वय ५०, व्यवसाय सुपरवायझर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २७ ऑक्टोबर रोजी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९८१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३२४(४) प्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Mr. Ashutosh & Mrs. Manisha are the Owners/ Holders of land bearing Survey No 48, Hissa No 2, admeasuring 00H 01.85R i.e 2000 Sq.fts with construction in Village Lohgaon, Taluka - Haveli District - Pune within the limits of PMC., and bounded as follows East - Road, West- Khese, North - Santosh Hari Lakhande, South - Yashwant Eknath Tavale. The said land is purchased from Hanumant Dattatray Chobhe & Pradip Ashok Ghanmode vide Sale Deed dated 30.09.2026, registered at Sub – Registrar, Haveli – 14 at serial no – 27915. Mr. Ashutosh & Mrs. Manisha states and declares that Original Power of Attorney dated 02.01.2026 executed by Hanumant Dattatray Chobhe & Pradip Ashok Ghanmode in favour of Omkar Sambhaji Waghmare & Vivek Damodar Khandave, registered at Haveli – 2 at serial no – 118 along with RR are lost and misplaced. The said owners have assured that they have clear and marketable title to the said Property. Now my client intends to obtained loan from Vastu Housing Finance Corporation Ltd and If any person, bank institution or authority having any claim, objection or interest or having in possession of above Original lost documents, should inform me on address given below within 7 days from the date of this notice.

**Adv. Vanashree G Kshirsagar**
**VASTU HOUSING FINANCE CORP LTD,**
OFFICE NO. 603 C AND 604 D, BUILDING VANTAGE 21, SR.NO. 133, PIMPLE SAUDAGAR, PUNE-411027 **Mob. 9823598801,**
**Email - vanashree.kshirsagar@vastuhfc.com**

**Pune**
**Date:29/10/2026**

**ग्रामपंचायत पारगाव तर्फे खेड,** ता. आंबेगाव, जि.पुणे

**खुली निविदा सूचना क्र.१**

**बी-१ निविदा सूचना क्र. १/२०२६-२०२७**

| अ. क्र. | कामाचे नाव | टेंडर रक्कम | टेंडर फी | इसारा रक्कम | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पारगाव तर्फे खेड येथे शाळा अंगणवाडी व इतर ठिकाणी cctv बसविणे साठी साहित्य पुरवठा करणे ता. आंबेगाव, जि. पुणे | १,५०,०००/- | ५००/- | १% | नोंदणीकृत कंत्राटदार |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) वरील कामाचे प्रपत्र ग्रामपंचायत कार्यालय पारगाव तर्फे खेड, ता. आंबेगाव, जि.पुणे येथे उपलब्ध करून देण्यात येईल. २) सदर निविदा पत्रासोबत नियम व अटी शर्ती असतील. ३) सदर निविदा दि. २९/१०/२०२६ गुरुवार ते ०३/११/२०२६ सकाळी ११ वाजेपर्यत नियम व अटीनुसार जमा करावीत.

**ग्रामसेवक सरपंच**
**ग्रामपंचायत पारगाव तर्फे खेड**
**ता.आंबेगाव, जि.पुणे.**

# दुष्काळाचा सामना एकजुटीने करा, बांधावरून वाद नको पोलीस ठाण्यात तक्रार नको : जरांगे पाटील

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** सध्या दुष्काळाचे भयानक संकट आपल्या समोर उभे आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने पुढे येऊन एकमेकांना सहकार्य करावे. शेतकऱ्यांनी एकमेकांच्या बांधावरून वाद घालू नयेत, एकमेकांचे बांध कोरू नयेत आणि गावातील एकाही व्यक्तीची तक्रार पोलीस ठाण्यापर्यंत जाणार नाही, याची काळजी घ्यावी, तसेच शेतीला जोडधंदा म्हणून नोकरी व व्यवसाय या क्षेत्रात उतरा याशिवाय प्रगती शक्य नाही असे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केले.

साकत येथे श्री सद्गुरू रामचंद्र बोधले महाराज यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त ह. भ. प. उत्तम महाराज वराट यांच्या नेतृत्वाखाली आयोजित भव्य अखंड हरिनाम



सप्ताहाचा शुभारंभ मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या धार्मिक सोहळ्याला संत-महंत, वारकरी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांना एकजुटीचे महत्त्व पटवून दिले. दुष्काळाचे संकट गंभीर असून, अशा परिस्थितीत समाजातील प्रत्येकाने एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. पाणी आणि शेतीच्या प्रश्नांवरून आपापसांत वाद निर्माण करण्याऐवजी सामंजस्याने मार्ग काढावा. शेतकऱ्यांनी एकमेकांच्या बांधावरून वाद करू नयेत. गावातील वाद गावातच सामोपचाराने मिटवावेत. कोणत्याही कारणामुळे पोलीस ठाण्यापर्यंत तक्रार जाणार नाही, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

तरुणांना मार्गदर्शन करताना जरांगे पाटील म्हणाले की, तरुणांनी व्यसनांच्या आहारी जाऊ नये. समाजात एकजूट कायम ठेवून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा. गावातील गोरगरीब, गरजू आणि अडचणीत असलेल्या लोकांना मदत करावी. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका तरुणांनी स्वीकारावी. समाजाची ताकद ही एकजुटीत असून, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीतूनच गावाचा विकास साधता येतो, असा संदेश त्यांनी दिला.

श्री सद्गुरू रामचंद्र बोधले महाराज यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहामुळे साकत परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. ह. भ. प. उत्तम महाराज वराट यांच्या नेतृत्वाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, हरिनाम, कीर्तन आणि संतविचारांच्या माध्यमातून आध्यात्मिक संस्कारांचा जागर केला जात आहे.या सप्ताहाच्या शुभारंभप्रसंगी संत-महंत, वारकरी संप्रदायातील मान्यवर, ग्रामस्थ आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने मनोज जरांगे पाटील यांनी दुष्काळ, शेतकऱ्यांमधील सलोखा, व्यसनमुक्ती आणि सामाजिक एकजुटीचा दिलेला संदेश उपस्थितांसाठी महत्त्वपूर्ण ठरला. दुष्काळाच्या संकटात एकमेकांना मदतीचा हात द्या, आपापसांतील वाद टाळा आणि समाजातील गोरगरिबांच्या पाठीशी उभे राहा, हा संदेश साकतनगरीतील या धार्मिक सोहळ्यातून देण्यात आला.

साकत येथील अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ करून मनोज जरांगे पाटील जामखेड शहरात आल्यावर छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांचा सत्कार करण्यात आला तसेच जिल्हा बँकेवर बिनविरोध निवड झालेले सचिन घुमरे यांचा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला यानंतर समाज बांधवांच्या वतीने बीड कॉर्नर वर प्रा मधुकर राळेभात व संजय काशिद तसेच अनेक समाज बांधवांच्या उपस्थित सत्कार करण्यात आला यानंतर मंगेश आजबे मित्रमंडळाच्या वतीने त्यांच्या कार्यालयासमोर सत्कार करण्यात आला विविध ठिकाणी सत्कार घेऊन जरांगे पाटील यांचा ताफा पुढे रवाना झाला

## दखल



### ॲड. अरुण महाराज पुंडे यांना ‘संत पायिक पुरस्कार’ प्रदान

**राशीन :** अध्यात्माला सामाजिक बांधिलकीची जोड देत गेली चार दशके हरिनाम, रामकथा, कीर्तन आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून समाजात संस्कारांची रुजवण करणारे ह.भ.प. ॲड. अरुण महाराज पुंडे यांना मानाचा ‘संत पायिक पुरस्कार’ प्रदान करून त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला. धार्मिक प्रवचनांच्या माध्यमातून कुटुंबव्यवस्था, नातेसंबंध आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण योगदानाची या पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली. मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या अनुदानातून आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने २५ ऑक्टोबर रोजी सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित संत साहित्य संमेलन २०२६ मध्ये हा सन्मान प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास श्री क्षेत्र गोदाधाम, सराला बेटचे महंत रामगिरीजी महाराज, ज्येष्ठ रंगकर्मी योगेश सोमण, संत साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. दिलीपराव धनेश्वर, सचिव संजय खेले, मार्गदर्शक अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, स्वागताध्यक्ष सतीश तथा आबा मुळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

### चांडगावचे मच्छिंद्र चाकणे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षकेतर पुरस्कार



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील चांडगावचे भूमिपुत्र तथा रयत शिक्षण संस्थेचे कर्मचारी मच्छिंद्र भगवान चाकणे यांना त्यांच्या प्रदीर्घ, गुणवत्तापूर्ण आणि समर्पित सेवेसाठी ‘राष्ट्रीय आदर्श शिक्षकेतर पुरस्कार २०२६’ प्रदान करून गौरविण्यात आले. बी. दि. चेंज फाउंडेशनच्या वतीने चिखली (पुणे) येथे आयोजित आदर्श शिक्षक गौरव सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात निष्ठेने आणि जबाबदारीने सेवा बजावत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या चाकणे यांना राष्ट्रीय स्तरावरील सन्मान मिळाल्याने चांडगावसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील व्यक्तीने आपल्या सेवाकार्यातून मिळविलेला हा सन्मान इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. चाकणे यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, उत्तर विभाग विभागीय समन्वय समितीचे चेअरमन आमदार रोहित पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, उत्तर विभाग सल्लागार समितीचे सदस्य राजेंद्र आबा म्हस्के, स्कूल कमिटी सदस्य दत्तात्रय वाघ व विनायक रसाळ, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागाचे माजी विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, आढळगावचे माजी वरिष्ठ लेखनिक तुकाराम बोळगे, न्यू इंग्लिश स्कूल, चांडगावचे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष संतोष म्हस्के, युवा नेते रवींद्र नाना म्हस्के, माजी सरपंच शशिकांत जगताप, माजी उपसरपंच महादेव म्हस्के, चांडगाव सेवा सोसायटीचे उपाध्यक्ष पंढरीनाथ चाकणे, माजी उपाध्यक्ष शिवाजी खामकर, सी-डॅक, पुणे येथील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी संजय चाकणे यांनी अभिनंदन केले.

### समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या इशिता काकडेची राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत बाजी

**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे-बांगरवाडी येथील विद्यार्थिनी इशिता काकडे



हिने नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत ओपन साईट प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या शानदार कामगिरीच्या जोरावर तिची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. इशिता हिने अचूक नेमबाजी आणि कौशल्याच्या जोरावर हे यश मिळविले. तिच्या या यशासाठी क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक वऱ्हाडी आणि किशोर काकडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. इशिताच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी तिचे अभिनंदन केले.

## विद्यार्थ्यांना मैदानी खेळासाठी प्रोत्साहित करावे : आ. कर्डिले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथील श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. वेटलिफ्टिंग, शूटिंग, जुदो, कुस्ती, मल्लखांब आणि मैदानी खेळ अशा विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. अनेक खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धांसाठी निवड झाली आहे. तर काही विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशस्वी खेळाडूंचा आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यश संपादन केलेल्या खेळाडूंमध्ये श्रेयस गाढे याची वेटलिफ्टिंग, हर्षल होले व तेजस



पोटे यांची शूटिंग, समीक्षा साळवे हिची जुदो तसेच कुस्ती, अंजली गागुल हिची मल्लखांब, तर रोहित अजबे आणि सौरभ मराठे यांची कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मैदानी स्पर्धांमध्येही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपली छाप उमटवली. साक्षी वामन हिने ॲथलेटिक्समधील ट्रिपल जंप स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. सुधांशू बर्डे याने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक तर लांब उडी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांना शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त शारीरिक शिक्षण संचालक डॉ. मनीषा पुंडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना आमदार अक्षय कर्डिले यांनी ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीविषयी महत्त्वपूर्ण भाष्य केले. ते म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थीही विविध खेळांमध्ये चमकत आहेत. मात्र आज ग्रामीण भागातील खेळांची मैदाने लुप्त होत चालली आहेत ही खंत आहे. मोबाईलच्या युगात मैदानी खेळ हरवत चालले आहेत. विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास होण्यासाठी मैदानी खेळ खेळणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

## आ. राजळेनी बन्नोमा यात्रा उत्सवानिमित्त विजेच्या विशेष रोहित्राची केली व्यवस्था

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगावसह पंचक्रोशीतील लाखो हिंदू - मुस्लिमांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री साध्वी बनोमा यात्रेची सालाबादप्रमाणे या ही वर्षी सुरुवात झाली असून या यात्रेचा ४ ते ५ दिवसाचा कालावधी असल्याने ग्रामीण भागात सतत खंडित होणारा विजेचा पुरवठा सुरळीत रहावा व सध्या आहेत त्या रोहित्रावर जादा भार येऊ नये म्हणून यात्रेच्या निमित्ताने एक विशेष रोहित्र मिळावे अशी ही प्रमुख मागणी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने आमदार मोनिकाताई राजळे यांच्याकडे केली असता आमदार राजळे यांनी तात्काळ वीज महावितरण कंपनीच्या वरिष्ठांशी संपर्क साधून १०० के व्हि क्षमतेचे रोहित्र (ट्रान्सफॉर्म) बसवण्याचे आदेश देताच ते बसवण्यात आले आहे. अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे शेवगाव तालुका उपाध्यक्ष रामकाका केसभट यांनी दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, सालाबादप्रमाणे या ही वर्षी बोधेगाव येथील श्री



साध्वी बन्नोमा यात्रेस कोजागिरी पौर्णिमेनंतर यात्रेस प्रारंभ झाला असून ऊस गळीत हंगामामध्ये ग्रामीण भागातील वीज वेळोवेळी खंडित होत असल्याचा अनुभव लक्षात घेत येथील यात्रा कमिटीच्या वतीने आमदार राजळे यांना यात्रेचे निमंत्रण देताना विजेच्या बाबतीतही चर्चा केली असून आमदार राजळे यांनी तात्काळ दखल घेऊन यात्रा काळात जास्तीच्या भारामुळे वीजपुरवठा खंडित होऊ नये म्हणून वीज महावितरण अधिकाऱ्याशी संपर्क साधून १०० के व्हि क्षमतेचे रोहित्र बसवण्याचे सांगताच ते बसवण्यात आले आहे या वेळी रामकाका केसभट, प्रसाद पवार,अनिल घोरतळे,प्रकाश काळे ,दत्तात्रय शिंदे, हिरालाल जैन, अविनाश राजळे यांच्यासह इतरही ग्रामस्थ उपस्थित होते.

### शिव सायकरची अबॅकस स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी!

**राशीन :** महाराष्ट्र टीचर अबॅकस असोसिएशनच्या वतीने ३० ऑगस्ट २०२६ रोजी निगडी, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत राशीन येथील डायनॅमिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता पहिलीत शिक्षण घेणाऱ्या शिव अजिनाथ सायकर याने उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत त्याने आपल्या बुद्धिमत्तेची, गणितीय कौशल्याची आणि मेहनतीची प्रभावी छाप उमटवली. त्याच्या या यशामुळे राशीनच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान वयातच अबॅकससारख्या कौशल्याधारित विषयात राष्ट्रीय स्तरावर यश मिळवणाऱ्या शिवचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या या यशाबद्दल आयोजित गौरवप्रसंगी त्याला गुलाबपुष्प, पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## मनसेच्या वतीने कर्जत तहसिलदारांना विविध मागण्यांचे निवेदन

### मागण्या मान्य न झाल्यास मनसेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यात यंदाच्या वर्षी दुष्काळी परिस्थिती असून या भीषण दुष्काळी परिस्थितीत खाजगी फायनान्स कंपन्या व बँकाने कर्जाची वसुली सक्तीने सुरू केली आहे.

बँका व फायनान्स कंपन्यांकडून होत असलेले कर्ज वसुली तात्काळ थांबवावी, अन्यथा कर्जत तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबतचे लेखी निवेदन कर्जतचे तहसीलदार रवि सतवन यांना नुकतेच देण्यात आले आहे.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कर्जत तालुकाध्यक्ष सचिन सटाले, तालुका उपाध्यक्ष आबासाहेब उघडे, जिल्हा



उपाध्यक्ष निखिल जगधने, शेतकरी सेना अध्यक्ष लखन जंजिरे, राजेंद्र जगन्नाथ गांगर्डे, युवा नेते भाऊसाहेब मेटे, सचिन साळवे, तुषार जाधव, बाबासाहेब बचाटे यांच्यासह मनसेचे सर्व पदाधिकारी, मनसैनिक उपस्थित होते.

या देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कर्जत तालुक्यातील त्रस्त शेतकरी, महिला बचत गट आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अत्यंत ज्वलंत आणि गंभीर समस्यांकडे शासनाने दुर्लक्ष केले असून सक्तीची कर्ज वसुली हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

सध्या संपूर्ण कर्जत तालुक्यात तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी व सर्वसामान्य जनता हवालदिल झाली आहे.

शासनाने तातडीने कर्ज वसुली मुद्यांची दखल घेऊन योग्य ती कठोर पावले उचलली नाहीत, तर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

## कुकडी डावा कालवा ३५ दिवसांचे रोटेशन



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

### पारनेर तालुक्यातील लाभक्षेत्र परिसरात आनंद

**निघोज :** राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुकडी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत कुकडी डावा कालव्याला ३५ दिवसांचे पाण्याचे रोटेशन दि.५ नोव्हेंबर रोजी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचे पारनेर तालुक्यातील लाभधारक शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला असून याबद्दल उपमुख्यमंत्री पवार, नामदार विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते सर यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले असून धन्यवाद व्यक्त केले आहेत. याबाबत निघोज परिसर कृषी फलोद्यान संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे,शिखर पाणी वापर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष झिंजाड, अध्यक्ष शिवाजीराव डेरे, महासंघाचे कार्याध्यक्ष तथा कार्यकारी संचालक विश्वनाथ येवले, उपाध्यक्ष रामाशेठ निचीत, अमोल कातोरे, संचालक दिलीपराव मदगे, धोंडीभाऊ भोर, संतोषराव मोरे, पांडुरंग ढवळे, अरुणशेठ तांबोळी व पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी व संचालक मंडळानी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री दिलीपराव वळसे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर, जुन्नरचे आमदार शरद दादा सोनवणे, श्रीगोंद्याचे आमदार विक्रम पाचपुते, शिरुरचे आमदार माऊली आबा कटके तसेच कुकडी अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. साधारण हे पाणी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सोडण्याचा निर्णय घेण्यात येणार होता. मात्र राज्यातील दुष्काळी परिस्थिती तसेच पुणे,अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पाण्याची तिव्र टंचाई तसेच बहुसंख्य गावातील नळपाणी पुरवठा योजना पाण्याच्या टंचाईमुळे बंद पडल्या होत्या याचा विचार करुन कुकडी कालवा सल्लागार समीतीमध्ये यावर साधक बाधक चर्चा होऊन तसेच उपस्थित सर्व आमदारांनी पाणी दि. ५ नोव्हेंबरला सोडल्यास कुणालाच अडचण येणार नाही. तसेच अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानुसार पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत कमी पाण्यामध्ये पिके घेण्याबाबत चर्चा झाली असून या ३५; दिवसाचे पाण्याचे रोटेशनचा वापर जनतेने जास्तीत जास्त पिण्याच्या पाण्यासाठी करावा तसेच हिरव्या चाऱ्याची गरज लक्षात घेता मोठ्या प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध करुण याचा फायदा जनावरांना कसा होईल याचाही विचार शेतकऱ्यांनी करणे आवश्यक असल्याचे आवाहन संबंधितांनी केले आहे.

पारनेर तालुक्यातील लाभधारक परिसरात पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली होती. बहुसंख्य गावात विशेष करुण जवळा,निघोज, वडनेर या मोठ्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. मात्र सरकारने पाणी सोडण्याचा निर्णय घेऊन जनतेसाठी अतिशय महत्वपूर्ण काम केले असून याचा फायदा सर्वांनाच होईल अशी प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

## अवघ्या सात वर्षांच्या अभयने घेतला रेहेकुरी अभयारण्य परिसर स्वच्छतेचा वसा

डॉ अफरोजखान पठाण । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** वय वर्षे सात. सकाळी आपल्या वडिलांसोबत सायकलवर रेहेकुरी अभयारण्य (ता. कर्जत) येथे जात मागील पंचवीस दिवसांपासून परीसरातील कचरा गोळा करणे, स्वच्छता राबवणे अशी मोहीम या चिमुकल्याने हाती घेतली आहे. विशेष म्हणजे रविवारी या चिमुकल्या हाताने चक्क वन्य प्राण्यांसाठी असलेला पाणवठा अवघ्या काही मिनिटांत स्वच्छ करीत समाजापुढे एक आदर्श ठेवला. अभय गणेश खराडे (रा.गायकरवाडी) या स्वच्छतादूताचे नाव. मागील सहा वर्षांपासून स्वच्छ, सुंदर आणि हरीत कर्जतसाठी झटणारे सर्व सामाजिक संघटनेच्या श्रमप्रेमींच्या कार्याला तो आपले आदर्श मानतो.

कर्जतची सर्व सामाजिक संघटना मागील सहा वर्षांपासून पर्यावरण संवर्धन कार्यास अखंड पार पाडत आहे. २ ऑक्टोबर २०२० पासून या श्रमप्रेमींनी स्वच्छता अभियानापासून सुरू केलेले कार्य आज लाखो वृक्षलागवड करण्यापर्यंत लीलया पोहचवले आहे. नुसती लागवड न करता ती झाडे जगविण्यासाठी हे सर्व सामाजिक संघटनेचे श्रमप्रेमीं नित्य-नियमाने रोज एक तास श्रमदान आजमितीस पार पाडत आहे. याच कार्याला आपले आदर्श मानत गायकरवाडी (ता.कर्जत) येथील अवघ्या सात वर्षाच्या अभय गणेश खराडे या चिमुकल्याने आपल्या छोट्या हाताने रेहेकुरी अभयारण्याचा परिसर स्वच्छ



करण्याची मोहीम हाती घेतली आहे. २ ऑक्टोबर २०२६ पासून

आपल्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर या चिमुकल्याने तो ध्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपली पाऊले उचलली आहे. विशेष म्हणजे अभय हा दुचाकी किंवा चारचाकी कार ने येता आपल्या वडिलांसोबत स्वता सायकल चालवत नियोजित ठिकाण गाठत आपली स्वच्छतेचे कार्य कोणतेही दिखाऊपणा न करता पार पाडत आहे. याच धर्तीवर रविवार (दि.२५) रोजी अभयने वन्य प्राण्यांची तहान भागविणारा पाणवठ्याची अस्वच्छता पाहिली. त्यात पडलेला वाळलेला पाळा-पाचोळा, गायीचे शेण, लहान-सहान दगड गोटे आणि मातीचा ढिगारा पाहून त्याचे लहान मन अस्वस्थ झाले आणि चक्क पाणवठयातील तो घाण-कचरा आपल्या चिमुकल्या हातात खोरे घेत जीवाला झेपेल त्या पद्धतीने अवघ्या काही मिनिटांत स्वच्छ करीत समाजापुढे एक आदर्श ठेवला. त्याच्या या कार्याने निश्चित परिसरातील निसर्गप्रेमींना देखील भुरळ घातली.

### त्याच्या कार्यास वडिलांची साथ

अभयचे वडील गणेश यांचे कर्जत शहरात एक लहान हॉटेल असल्याची माहिती मिळते. आपल्या मुलांच्या पर्यावरण संवर्धनाच्या कार्यास ते देखील साथ देताना दिसतात. दररोज सकाळी दोघे बाप-लेक स्वतंत्र सायकलवर रेहेकुरी-वालवड रस्त्यावर वाटसरुंच्या नजरेस पडतात. थोडी आरोग्यदायी कसरत-व्यायाम करून अभयने हाती घेतलेला संकल्पास त्याच्या साथीला जात बहुमोल सहकार्य करताना दिसतात.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.२९ ऑक्टोबर २०२६ | पान ८

## देवळाली प्रवरातील गणेशनगरमध्ये गॅस टाकीने घेतला पेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील गणेशनगर परिसरात अविनाश शेंडगे यांच्या घरातील गॅस टाकीने अचानक पेट घेतल्याची घटना घडली. या घटनेमुळे घरातील सदस्यांची धावपळ उडाली. गॅस टाकीने पेट घेतल्याने घरातील काही वस्तूंनीही आग पकडली. त्यामुळे घरातील वस्तूंचे काही प्रमाणात नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नगरसेवक सौरभ मुसमाडे, लक्ष्मी गॅस एजन्सीचे रवी मोरे,विकास पवार यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. देवळाली प्रवरा नगरपरिषद अग्निशामक दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. घरातील गॅस टाकीने अचानक पेट घेतल्याने काही काळ परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

# भगवंतांचे नामस्मरण व गुरुंचा आदर करा

### महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरी महाराज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील गुरुदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड येथे आद्य शंकराचार्यांनी ८ व्या शतकात स्थापन केलेल्या आणि भगवान दत्तात्रय मुख्य दैवत असलेल्या सर्वात प्राचीन पंच दशनाम जूना आखाड्या'चे सर्वोच्च अध्यात्मिक महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरी महाराज यांचे मृदुंगाच्या गजरात भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचा जयघोष करत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.भगवंतांचे नामस्मरण व गुरूंचा आदर जीवनात करत रहा असा संदेश महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरी महाराज यांनी यावेळी बोलतांना दिला. स्वामी अवधेशानंदगिरी महाराज यांचे देवगड भूमीत आगमन झाल्यानंतर झाल्यानंतर त्यांचे गुरूदेव दत्त



छाया : सुधीर चव्हाण नेवासा

पिठाचे प्रमुख राष्ट्र संत गुरुवर्य भास्करगिरी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी दर्शन घेत स्वागत केले.भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सदगुरू किसनगिरीबाबांच्या समाधी स्थळाचे त्यांनी दर्शन घेतले.

यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात मंदिर प्रांगणात मिरवणूक काढण्यात आली. देवगड मंदिर प्रांगणातील ज्ञानसागर सभामंडपमध्ये मिरवणुकीचा समारोप झाल्यानंतर गुरुवर्य भास्करगिरी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते पुष्पहार व तुलसीहार घालून महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरी महाराज यांच्यासह उपस्थित संत महंतांचे संतपूजन यावेळी करण्यात आले.संतसेवेकरी बजरंग विधाते यांनी आलेल्या सर्व संत महंतांचे स्वागत केले.

यावेळी बोलतांना महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज म्हणाले की भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सदगुरू किसनगिरीजी बाबांचे समाधी मंदिर व देवगड येथील दृश्य अलौकिक असे आहे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या अधिपत्याखाली हे क्षेत्र अलौकिक असे बनले आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले. नुसत्या नामस्मरणाने प्रकट होते अशी भगवान दत्तात्रय ही जागृत देवता आहे,ते स्वतः नारायण आहे म्हणून त्यांचे चिंतन मनाने वाचाने करा ही श्रेष्ठ साधना असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्संग सोहळयाच्या प्रसंगी मंजूर संस्थानचे महामंडलेश्वर स्वामी शिवानंदगिरी महाराज, सावखेडा येथील गिरी आश्रमाचे महंत कैलासगिरीजी महाराज, स्वामी रमेशानंदगिरी महाराज, महामंडलेश्वर परमानंदगिरी महाराज, खडेश्वरी देवस्थानचे महंत गणेशानंद महाराज, डॉ. जनार्धन महाराज मेटे, माऊली आश्रमाचे महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे, गोधेगावचे मच्छिंद्र भारती महाराज, हभप भिसे बाबा, विश्व हिंदू परिषदेचे प्रांतप्रमुख आप्पासाहेब बारगजे, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, काशिनाथ नवले अण्णा, मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख, बाळू महाराज कानडे, मुळा कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील, सरपंच अजय साबळे यांच्यासह संत महंतांसह वारकरी संप्रदायातील सर्व कीर्तनकार मंडळी देवगड सेवेकरी मंडळी, महिला व पुरुष भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## वाळू तस्कर व मुरुम माफीयांची मुजोरी | थेट प्रांताधिकार्यावरच हल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यात मुरुम माफिया व वाळू तस्करांची मुजोरी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे. मुरुम चोरुन नेत असलेल्या ढंपरवर कारवाई करत असताना मुरुम माफियांनी थेट परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी विनीत शिर्के यांच्यावर जिवघेणा हल्ला करुन ढंपर पळवून नेल्याची घटना दि. २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास पिंपळगाव फुणगी परिसरात घडली. परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी विनीत विक्रांत शिर्के, वय ३२ वर्षे, हे दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजे दरम्यान राहुरी तालुक्यातील मालुंजा येथे प्रवरा नदी पात्रातील अधिकृत वाळू लिलावाचे दप्तर तपासणीसाठी गेले होते. दफ्तर पाहणी नंतर ते लाख जातप मार्गे चिंचोली येथे जात असताना पिंपळगाव फुणगी शिवारात एक विना नंबरचा ढंपर मुरुम वाहतूक करताना दिसला. त्यावेळी शिर्के यांनी सदर ढंपर अडवून स्वतः ढंपरमध्ये बसून ढंपर चालक धनराज चौधरी याला ढंपर राहुरी तहसील कार्यालयात घेण्यास सांगितले. काही अंतर पूढे गेल्यावर अज्ञात सहा आरोपी मोटारसायकलवर पाठलाग करत आले. त्यांनी ढंपरला ओव्हरटेक करुन ढंपर समोर मोटारसायकली आडव्या लावल्या. त्यानंतर आरोपींनी शिर्के यांना धक्काबुक्की करून ढंपरमधून खाली ओढले. आणि त्यांना ढंपरच्या पूढच्या चाकाखाली लोटून दिले. तेव्हा ढंपर चालकाने शिर्के यांच्या अंगावर ढंपर घालण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शिर्के यांनी रस्त्याच्या कडेला उडी मारून स्वतःचा जीव वाचवला. त्यानंतर आरोपी मुरुमाने भरलेला ढंपर घेऊन पळून जाऊ लागले. तेव्हा शिर्के व त्यांचे वाहन चालक प्रवीण खरमाळे यांनी सुमारे २० किलोमीटर अंतर ढंपरचा पाठलाग केला. मात्र आरोपी ढंपर घेऊन पसार झाले. घटने नंतर परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी विनीत विक्रांत शिर्के यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी ढंपर चालक धनराज चौधरी, ढंपर मालक दिपक ऊर्फ प्रवीण बबन लाटे, रा. चिंचोली, ता. राहुरी, तसेच अनोळखी सहाजण अशा एकूण आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस पथक आरोपींचा शोध घेत आहेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख हे करीत आहे.

# शिवनेरी चौकातील घरफोडीच्या गुन्ह्यात मध्य प्रदेशातील आरोपी जेरबंद

### १ लाख ६ हजाराचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर शहरातील शिवनेरी चौकात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने मध्य प्रदेशातील आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एक लाख सहा हजार पाचशे रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही सराईत टोळी असून त्यांच्याकडून इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस सूत्रांकडून वर्तविण्यात येत आहे.

या घटनेची सविस्तर माहिती अशी की, दि. १३/१०/२०२६ रोजी फिर्यादी विवेक मारोतराव साखरे (मातोश्री अपार्टमेंट, शिवनेरी चौक, अहिल्यानगर ) याचे राहते घरामधुन अज्ञात आरोपीतांनी सोन्या चांदीचे दागीने व रोख रक्कम चोरून नेली.याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सपोनि हरिष भोये व पोलीस अंमलदार अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, शाहीद शेख, संदिप पवार, फुरकान शेख, मनोज साखरे, अमोल कोतकर व महादेव भांड अशांना गुन्हा उघडकीस आणणेबाबत मार्गदर्शन करुन पथकास रवाना केले.

दि. २८ ऑक्टोबर रोजी तपास पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा कपील चंपालाल चावडा, (रा.मध्यप्रदेश ) याने त्याचे साथीदारासह केला असून तो नेवासा फाटा येथे येणार आहे.पथकाने नेवासा फाटा परिसरात आरोपीचा शोध घेऊन १) कपील चंपालाल चावडा, (वय २३, रा.पटवारी कॉलनी, बडवा, ता.महेश्वर, जि.खरगोण, मध्यप्रदेश ) यास ताब्यात घेतले.ताब्यातील आरोपीकडे विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार राजा चेयनसिंग पटेल, (मध्यप्रदेश) याचेसह केला असून चोरी केलेला मुद्देमालापैकी काही दागीने हे राजा चेयनसिंग पटेल याचेकडून उर्वरीत हे छत्रपती संभाजीनगर येथे विकल्याची माहिती सांगीतली. पोलीस पथकाने राजा चेयनसिंग पटेल, (वय २३, रा.जयमलपूरा, बडवा, ता.महेश्वर, जि.खरगोण, मध्यप्रदेश) यास ताब्यात घेऊन त्याचेकडून १,०६,५००/- रू किंमत त्यात ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, ५० ग्रॅम वजनाचे एक चांदीचे बिस्कीट, एक मोबाईल, लोखंडी पान्हा, एक बॅग असा मुद्देमाल जप्त केला.

तसेच गुन्हयातील चोरीचा मुद्देमाल घेणारे अनिल रामनारायण तिवारी, (वय ५६, रा.खाराकुवा, भगवान प्लाझा, प्लॉट नं.३ गुजराती हायस्कुलजवळ, छत्रपती संभाजीनगर ) व भारत नानासाहेब जोशी,( वय ३२, रा.हरिओमनगर, जेठवाडा रोड, हर्सुल तलाव, छत्रपती संभाजीनगर) यांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींना मुद्देमालासह कोतवाली पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, गुन्हयाचा पुढील तपास कोतवाली पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

## हुंड्याच्या छळाला कंटाळून सायलीची आत्महत्या | सासरच्या चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : हुंड्यासाठी पैशांची मागणी, घरकामावरून होणारा कथित छळ, शिवीगाळ आणि मारहाण याला कंटाळून विषारी औषध प्राशन केल्याने सायली वानखेडे (वय २३) हिचा मृत्यू झाल्याची घटना महांकाळ वडगाव येथे घडली. या प्रकरणी सायलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून पती, सासू, सासरे आणि अन्य एका नातेवाइकाविरुद्ध श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, बुधवारी (दि. २८) सायलीच्या दशक्रिया विधीदरम्यान माहेरच्या नातेवाइकांचा संताप अनावर झाल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. सायलीचे माहेर निपाणी वडगाव येथे असून, तिचा विवाह १० ऑगस्ट २०२५ रोजी महांकाळ वडगाव येथील प्रतीक वानखेडे याच्याशी झाला होता. सुरुवातीला संसार सुरळीत सुरू होता. मात्र, लग्नानंतर सुमारे दोन महिन्यांनी पतीला पुणतांबा येथे औषधांचे दुकान सुरू करायचे असल्याचे सांगून माहेरून ५० हजार रुपये आणण्याची मागणी करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यानुसार माहेरच्या मंडळींनी ही रक्कम दिली. घरकामावरून वारंवार टोमणे मारणे, शिवीगाळ करणे, दमदाटी आणि मारहाण होत असल्याचे सायलीने फोनवरून आईला सांगितले होते. मुलीचा संसार टिकावा म्हणून माहेरच्या मंडळींनी सासरच्या लोकांची समजूत काढली; मात्र त्रास सुरूच राहिल्याचा आरोप आहे. १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३६ वाजता सायलीने आईला फोन करून सासरी होणाऱ्या त्रासाला कंटाळून विषारी औषध प्राशन केल्याचे सांगितले. त्यानंतर तिला साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना १९ ऑक्टोबर रोजी दुपारी २.१२ वाजता तिचा मृत्यू झाला. बुधवारी दशक्रिया विधीदरम्यान माहेरच्या नातेवाइकांनी संताप व्यक्त केला. सासरच्या मंडळींना मारहाण झाल्याची माहिती असून, त्यानंतर नातेवाइकांनी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात धाव घेतली. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## तीन महिन्यांपूर्वीच्या भांडणातून दोघा चुलत भावांना मारहाण; १४ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरून १३ ते १४ जणांनी दोघा चुलत भावांना शिवीगाळ व दमदाटी करत लोखंडी रॉड आणि लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील मालुंजा खुर्द येथील पाण्याच्या टाकीजवळ २२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. या मारहाणीत दोघे जखमी झाले असून त्यांच्यावर श्रीरामपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत मच्छिंद्र ऊर्फ चिम्या बापू गायकवाड (वय २६, रा. मालुंजा बुद्रुक, ता. श्रीरामपूर) यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबानुसार, २२ ऑक्टोबर रोजी रात्री मच्छिंद्र गायकवाड आणि त्यांचे चुलत भाऊ विजय ऊर्फ छोट्या प्रकाश गायकवाड हे दोघे मोटारसायकलवरून मानोरी येथून घरी जात होते. मालुंजा खुर्द येथील पाण्याच्या टाकीजवळ आले असता, तेथे थांबलेल्या १३ ते १४ जणांनी तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून दोघांना शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लोखंडी रॉड आणि लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी अमर दशरथ पवार, गौरव दशरथ पवार, किरण बाळासाहेब गायकवाड, मंगेश किशोर माळी, महेश राजेंद्र बर्डे, विठ्ठल विलास बर्डे (सर्व रा. मालुंजा खुर्द) आणि अन्य पाच ते सात जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# विजेची वायर तोडल्याने काका-पुतण्यात मारहाण दगड डोक्यात मारून जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : घराच्या विजेची वायर तोडल्याच्या कारणावरून झालेल्या वादात पुतण्याने काकाला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच डोक्यात दगड मारून जखमी केल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील प्रसाद शुगर रोड परिसरात २४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास घडली. याप्रकरणी पुतण्या गणेश सुखदेव पवार याच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गोरक्षनाथ भाऊसाहेब पवार (वय ३९, रा. वांबोरी, प्रसाद शुगर रोड, ता. राहुरी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, गोरक्षनाथ पवार यांच्या घरापासून काही अंतरावर त्यांचा पुतण्या गणेश पवार हा कुटुंबासह राहतो. २४ ऑक्टोबर रोजी रात्री गणेशने गोरक्षनाथ पवार यांना दूरध्वनी करून त्यांच्या मुलाने घराची विजेची वायर तोडल्याचे सांगितले आणि घरी बोलावले. त्यानुसार गोरक्षनाथ पवार हे गणेशच्या घरासमोर गेले. त्यावेळी त्यांनी आपल्या मुलाने नेमकी कोणती वायर तोडली, हे दाखविण्यास सांगितले. याचा राग आल्याने गणेशने त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच डोक्यात दगड मारून जखमी केले. भांडणाचा आवाज ऐकून गोरक्षनाथ पवार यांची पत्नी व मुलगा घटनास्थळी आले. त्यांनी मध्यस्थी करून वाद मिटविला. यानंतर गोरक्षनाथ पवार यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गणेश सुखदेव पवार याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# चांदा येथे मुळा उजव्या कालव्यात युवकाचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील सोमनाथ रामदास थोरात (वय २५) या युवकाचा मृतदेह बुधवारी सकाळी चांदा-पिंपळगाव रस्त्यावरील मुळा उजव्या कालव्याच्या पुलाजवळ आढळून आला. या घटनेमुळे चांदा परिसरात खळबळ उडाली आहे.

सोमनाथ थोरात हा चांदा येथील लोहारवाडी रस्त्यालगत असलेल्या थोरात वस्तीवरील रहिवासी होता. त्याच्या आई संगीता थोरात (वय ५०) यांनी २७ ऑक्टोबर रोजी सोनई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी सोमनाथ याचे अपहरण केल्याची तक्रार त्यांनी दिली होती. त्यानुसार सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १४०(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.



दरम्यान, बुधवारी सकाळी चांदा-पिंपळगाव रस्त्यावरील मुळा उजव्या कालव्याच्या पुलाच्या पूर्वेकडील बाजूस कालव्यामध्ये सोमनाथचा मृतदेह आढळला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. गावचे पोलिस पाटील कैलास अभिनव यांनी याबाबत सोनई पोलिसांना माहिती दिली.

सोनई पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक बाबा लबडे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नेवासा येथे पाठविण्यात आला आहे. सोमनाथचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता नसून या प्रकरणाचा पुढील तपास सहायक फौजदार एम. आर. आडकित्ते करीत आहेत.

# जंगल वाचविण्यासाठी 'भीमाशंकर सत्याग्रह'; वनसंरक्षणाच्या लढ्याला राज्यव्यापी बळ

### ३२ हजारांहून अधिक झाडांच्या तोडीचा मुद्दा ऐरणीवर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : झाडे म्हणजे केवळ हिरवळ नव्हे, तर पाण्याचे स्रोत, वन्यजीवांचा अधिवास आणि मानवी जीवनाचा आधार. याच नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने 'भीमाशंकर सत्याग्रह' या राज्यव्यापी अहिंसक अभियानाची घोषणा केली आहे. विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड, घटणारे जंगल आणि भविष्यात निर्माण होणारे पाणीटंचाईचे संकट यांविषयी जनजागृती करून वनसंरक्षणाच्या लढ्याला राज्यभरातून पाठबळ मिळविण्याचा या अभियानाचा उद्देश आहे.

कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवरच्या तीन हजार मेगावॉट क्षमतेच्या सायडोंगर-१ पंप्ड स्टोरेज प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन वळविण्याची आणि ३२ हजार ४९० झाडे तोडण्याची परवानगी मिळाल्याची वृत्ते प्रसिद्ध झाली आहेत. या पार्श्वभूमीवर परिसरातील जंगल, जैवविविधता आणि जलस्रोतांच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक ग्रामस्थांनी वृक्षतोडीला विरोध केल्यानंतर ती थांबविण्यात आल्याची वृत्ते असली, तरी ही स्थगिती किती काळासाठी आहे आणि पुढील काळात वृक्षतोड पुन्हा सुरू होणार का, याबाबत स्पष्टता आवश्यक असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

### नैसर्गिक जंगलाची भरपाई केवळ रोपांनी शक्य नाही!

प्रकल्पासाठी नव्याने सुमारे ९० हजार झाडे लावण्याचे नियोजन



असल्याची माहिती कंपनीकडून देण्यात आली आहे. मात्र, अनेक वर्षांत विकसित झालेल्या नैसर्गिक जंगलाची तुलना नव्याने लावलेल्या रोपांशी केवळ संख्येच्या आधारे करता येणार नाही.

जंगल जमिनीची धूप रोखते, भूजलाचे पुनर्भरण होण्यास मदत करते आणि असंख्य वनस्पती व वन्यजीवांना आश्रय देते. त्यामुळे वृक्षारोपणासाठी निवडलेल्या जागा, स्थानिक वृक्षप्रजाती, रोपांची देखभाल आणि प्रत्यक्षात जगलेल्या झाडांची संख्या यांचा स्वतंत्र व पारदर्शक अहवाल प्रसिद्ध करावा, अशी मागणी संघटनांनी केली आहे.

### पाणी, शेती आणि ग्रामीण जीवनाचा प्रश्न

जागतिक तापमानवाढ आणि हवामानातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर जंगलांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे बनले आहे. जंगलांवरील परिणामांचा संबंध केवळ वन्यजीवांपुरता मर्यादित नसून शेती, पाणीपुरवठा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशीही आहे. त्यामुळे पेज नदीचे खोरे, स्थानिक जलस्रोत आणि वन्यजीवांच्या अधिवासावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा सखोल अभ्यास करावा, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ड. कारभारी गवळी यांनी केली.

प्रकल्पाच्या सर्व मंजुऱ्या, नकाशे, वृक्षगणनेचे तपशील, जनसुनावणीचे इतिवृत्त आणि ग्रामसभांच्या नोंदी मराठीत सार्वजनिक कराव्यात. उर्वरित वृक्षतोड थांबवून पर्यावरणीय परिणामांचा स्वतंत्र फेरआढावा घ्यावा, तसेच बाधित ग्रामस्थ आणि आदिवासी समुदायांच्या हक्कांचे संरक्षण करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

स्थानिक ग्रामसंघर्ष समित्या, शेतकरी, विद्यार्थी आणि पर्यावरणप्रेमींनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनांनी केले आहे. अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे यांच्यासह कार्यकर्ते अभियानासाठी प्रयत्नशील आहेत. 'जंगल वाचवा, पाणी वाचवा, भविष्य वाचवा' हा संदेश राज्यभर पोहोचवून निसर्गाच्या संरक्षणासाठी लोकसहभागातून अहिंसक लढा उभारण्याचा निर्धार संघटनांनी व्यक्त केला आहे.